cmyk

## संपादकीय

### तहात हरण्याची परंपरा कायम?

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शिगेला पोहोचलेला संघर्ष अचानकच जाहीर झालेल्या युद्धविरामानंतर निवळला, पण त्यानंतर देशात मात्र विविध प्रश्नांची एक नवी मालिकाच सुरू झाली आहे. मुळात अमेरिकेच्या अध्यक्षांनी परस्पर जाहीर केलेला संघर्षविराम भारताने अधिकृतरित्या मान्य केला आहे की नाही याविषयीच सुरुवातीच्या काळात संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. अनेक मीडियावाल्यांनासुद्धा हा युद्धविराम मान्य नव्हता, भाजपाच्या प्रवक्त्यांनीही हा अधिकृत युद्धविराम झाल्याचे मान्य करायला आडवळणाने का होईना नकारच दिलेला दिसला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### शोपियाँमध्ये ३ दहशतवाद्यांचा खात्मा

श्रीनगर : जम्मू- काश्मीरमधील शोपियाँ येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांध्ये चकमक सुरू आहे. या चकमकीत तीन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. चकमकीची सुरूवात कुलमाग येथे झाली. पण नंतर दहशतवाद्यांनी शोपियाँमधील जंगलात पळ काढला. आणखी एक दहशतवादी परिसरात लपून बसला असावा, अशी माहिती सुरक्षा दलांच्या हाती लागली असून परिसरात कसून शोधमोहीम राबवली जात आहे. दक्षिण काश्मीरमधील शोपियाँमधील शुकरु केलर येथे दहशतवादी लपून बसल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली होती. यानुसार मंगळवारी सकाळपासून सुरक्षा दल आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम राबवली. लपून बसलेले दहशतवादी हे लष्कर- ए- तोयबाशी संबंधित असल्याचे समजते.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२३ | बुधवार, दि.१४ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांच्या जमिनींवर डाका टाकणे थांबवा; अन्यथा तीव्र लढा

## किसान सभेचा सरकारला ईशारा



**संभाजीनगर | पतिनिधी**

**राज्यभर शेतकऱ्यांच्या जमिनी विविध रस्ते व प्रकल्पांसाठी काढून घेण्याचे मोठे षडयंत्र राज्यात सुरू आहे. कायदा होऊनही अनेक शेतकऱ्यांच्या नावे सरकार जमीन करायला तयार नाही. राहत्या घरांच्या तळ जमिनीही अद्याप अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या नावे करण्यात न आल्याने शेतकऱ्यांच्या मनात मोठा असंतोष खदखदतो आहे. या सर्व प्रश्नांची चर्चा करून लढा तीव्र करण्याचा निर्णय आज दिनांक १३ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या राज्यव्यापी जमीन हक्क परिषदेत घेण्यात आला. किसान सभेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या हक्क परिषदेत शेतकरी संपाचा दिवस असलेल्या १ जून रोजी जमीन हक्कांसाठी तीव्र आंदोलन करण्याचा ठराव यावेळी एकमताने मंजूर झाला.**

किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या परिषदेचे उद्घाटन किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस विजू कृष्णन यांनी केले. देशभर कॉर्पोरेट कंपन्या व भाजपचे सरकार शेतीची मालकी शेतकऱ्यांकडून काढून घेण्यासाठी करत असलेल्या षडयंत्राबाबत त्यांनी मांडणी केली. या विरोधात लढ्याची दिशाही त्यांनी स्पष्ट केली. किसान सभेचे राज्य अध्यक्ष उमेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या परिषदेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे डहाणू मतदार संघाचे आमदार विनोद निकोले आवर्जून उपस्थित राहिले. विधानसभेच्या सभागृहात जमीन हक्कांची लढाई तीव्र करण्यासाठी माकपच्या वतीने कटिबद्ध असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. परिषदेचा मुख्य ठराव किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी मांडला. किसन गुजर, चंद्रकांत घोरखाना, नामदेव भांगरे, अमोल नाईक, बब्रुवाहन पोटभरे, शंकर सिडाम, रडका कलांगडा, लहानी दौडा, लक्ष्मीबाई काळे, गजेंद्र येळकर, अजय बुरांडे, सदाशिव साबळे, अर्जुन आडे, यांनी ठरावास पाठिंबा दिला. परिषद यशस्वी पान २ वर

## सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही - एकनाथ शिंदे

**मुंबई | प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांना कुठेही वाऱ्यावर सोडणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. तसेच अवकाळी पावसाच्या नुकसानी संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**



राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानावर भाष्य करत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे आश्वासन दिले आहे. तसेच आम्ही निवडणुकीत जे वचननामा दिला, त्यानुसार टप्प्याटप्प्याने पुढे जात आहोत. लाडकी बहीण योजनेसह विकासकामे आपण करत आहोत, असे शिंदे म्हणाले. पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, प्रिंटिंग मिस्टेक करणारे हे सरकार नाही. आम्ही जे बोलतो, ते करतो. सरकारची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. सगळ्या योजना सुरू ठेवत असताना सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. सरकारला काटकसर करावी लागली. या बजेटमध्ये काही खात्यांना निधी कमी मिळाला. मात्र, पुढच्या जुलै पुरवणी बजेटमध्ये भरून काढू. कुठल्याही खात्यावर अन्याय करण्याची भावना सरकारची नाही, असे ते म्हणाले. मंत्री संजय शिरसाट यांनी बोगस बियाण्यांवर धाडी टाकून पान २ वर

# मोदींचा पाकला पुन्हा इशारा

## भारत-पाकिस्तान सीमेजवळील आदमपूर (पंजाब) एअरबेसला भेट देत सैनिकांशी संवाद



### तिसऱ्याची मध्यस्थी चालणार नाही-परराष्ट्र मंत्रालय

'जम्मू आणि काश्मीरशी संबंधित कोणताही मुद्दा केवळ भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय चर्चेतूनच सोडवला जाईल. त्यात कोणत्याही तिसऱ्या पक्षाची भूमिका राहणार नाही. पाकिस्तानला बेकायदेशीरपणे व्यापलेले काश्मीर (पीओके) रिकामे करावे लागेल. हे भारताचे बऱ्याच काळापासूनचे धोरण आहे आणि त्यात कोणताही बदल झालेला नाही', असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट केले. ते मंगळवारी (दि. १३) पत्रकार परिषदेत बोलत होते. दरम्यान, भारत सिंधू जल करार तोपर्यंत स्थगित ठेवेल जोपर्यंत पाकिस्तान खात्रीशीर आणि ठामपणे सीमेपलीकडील दहशतवादाला पाठिंबा देणे बंद करत नाही, असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले.

**चंदीगड | प्रतिनिधी**

**'जेव्हा आमची क्षेपणास्त्रे लक्ष्यावर पोहोचतात, तेव्हा शत्रुचा थरकाप उडतो. जेव्हा आमचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे लक्ष्यांवर हल्ला करतात तेव्हा शत्रूंना भारत माता की जयचा आवाज ऐकू येते''. जेव्हा भारतीय भारत माता की जय... म्हणतात, तेव्हा दुश्मनदेखील कापतात, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतीय सैन्याला संबोधित करताना म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि.१३) पंजाबमधील भारत-पाकिस्तान सीमेजवळील आदमपूर (पंजाब) एअरबेसला भेट दिली आणि तेथील सैनिकांशी संवाद साधला.**

दहशतवादाविरोधात राबवण्यात आलेले ऑपरेशन सिंदूरचे शौर्य जगभरात पोहचलं. जगाने भारतीय एअर फोर्सची ताकद पाहिली आहे. भारतीय जवानांनी इतिहास रचला आहे. तुम्ही सर्वांनी कोटी कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. सैन्याचे कार्य नवीन पीढीसाठी प्रेरणादायी आहे. सैन्याने न्यूक्लिअर धमक्यांची हवाच काढून टाकली, असेही पीएम मोदी म्हणाले. पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मी अभिमानाने सांगू शकतो की तुम्ही सर्वांनी तुमचे लक्ष्य परिपूर्णतेने गाठले आहे. पाकिस्तानमध्ये केवळ दहशतवादी तळ आणि त्यांचे हवाई तळ उद्ध्वस्त झाले नाहीत तर त्यांच्या नापाक योजना आणि धाडसाचाही पराभव झाला. पीएम मोदी पुढे म्हणाले, दहशतवादी लपून भारतात आले, तुम्ही त्यांना मातीत पान २ वर

## पंकजा मुंडेंचा ऐतिहासिक निर्णय

### पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आता होणार समुपदेशनाने

**मुंबई | प्रतिनिधी**

**मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा व बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला आहे.**



समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही दि. १५ व १६ मे २०२५ रोजी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ६५० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत.पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना केल्यानंतर काही नवीन पदे निर्माण पान २ वर

## दहावीचा निकाल जाहीर

### महाराष्ट्रात पुन्हा मुलींनी मारली बाजी

**पुणे | प्रतिनिधी**




**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परिक्षेचा निकाला मंगळवारी दि.१३ रोजी जाहीर करण्यात आला. राज्याचा एकूण निकाल ९४ टक्के लागला असून, यंदाही मुलिंनीच बाजी मारल्याचे दिसून आले आहे.** पान २ वर

## माजी उपसभापती सुशिल साळुंके पोलिसांसमोर आत्मसमर्पण

### मारहाण प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला होता जामिन

**माजलगाव | प्रतिनिधी**

येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशिल विजयकुमार सोळंके यांनी दि १३ मे मंगळवार रोजी दुपारी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे.मारहाण प्रकरणीं एका गुन्हात ते आरोपी होते.त्यांचा जामिन सर्वोच्च न्यायालयाने,उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगर यांनी फेटाळुन आरोपी सुशिल साळुंके यांना दोन आठवडयाच्या आत आत्मसमर्पन करण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार सुशिल साळुंकेनी आत्मसमर्पण केल्यानंतर पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



फिर्यादी अशोक बालासाहेब सोळंके याच्या फिर्यादीवरुन पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८६.०० क्विंटल | २,००० | ३,०२५ | २,६०१ |
| ज्वारी/हायब्रिड: १००.५० क्विंटल | १,८७१ | ३,४०० | २,२६० |
| मका/लोकल:१४.०० क्विंटल | २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : १६.०० क्विंटल | ६,४०० | ६,६५५ | ६,५२७ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १०४.०० क्विंटल | १,७०० | २,५६६ | २,३०९ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,०५० | ४,३०० | ४,२०७ |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,४०१ | ५,४११ | ५,४०६ |

## शेतकरी कर्जमाफीवरून राजू शेट्टींची सरकारवर टिका

**कोल्हापूर | प्रतिनिधी**

शेतकरी कर्जमाफीवरुन महायुती सरकारवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी मंगळवारी (दि.१३) घणाघाती टीका केली. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचं आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिलं होतं. पण आता ते पाळायला तयार नाहीत. शेत मजुरांपेक्षा शेतकऱ्यांची बिकट अवस्था असल्याचं केंद्र सरकारचा रिपोर्ट आहे, असं म्हणत शेट्टी यांनी सरकारवर निशाणा साधला.

शेट्टी पुढे म्हणाले, ''महायुतीच्या नेत्यांनी हमीभावावर २० टक्के अनुदान देऊ सांगितलं होतं. मात्र तेही आश्वासन पूर्ण केलं नाही. सोयाबीन, कापूस, पान २ वर

## रोहा बलात्कार प्रकरणातील निकालावर गावकऱ्यांचा संताप

### उज्वल निकमांचा पराभव, पीडितेच्या कुटुंबावर अन्याय; आक्रोश मोर्चा काढून आरोपिला फाशी देण्याची केली मागणी

**रायगड | प्रतिनिधी**


रायगडमधील रोहा तालुक्यातील तांबडी गावातील एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आला होता. यामध्ये माणगाव सत्र न्यायालयाने सर्व सात आरोपींची निर्दोष मुक्तता केली. पेणमधील नवख्या वकिलांनी प्रख्यात वकील उज्वल निकम यांचा पराभव करणे ही आश्चर्यकारक आहे. हा निकाल आरोपींच्या बाजूने लागल्याने सर्वांनाच याचा धक्का बसला आहे. याप्रकरणी रोहा पान २ वर

# कृत्रिम वाळू धोरणास सरकारची मंजुरी !

## वेतनत्रुटी निवारण ते आयटीआय धोरण; मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतले सहा मोठे निर्णय

**मुंबई | प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृत्रिम वाळू धोरणास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत महसूल, महिला व बालकल्याण आणि कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या एकूण सहा निर्णयांना मान्यता देण्यात आली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्री उपस्थित होते.** पान २ वर



### मंत्रिमंडळाचे संक्षिप्त निर्णय

१) रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर. (महिला व बालविकास विभाग) २) नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना 'होम स्वीट होम' अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार. (महसूल विभाग) ३) कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी - प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/ संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार. एम-सँड तयार करणार्या युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार. (महसूल विभाग). ४) राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार. (वित्त विभाग). ५) राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण - आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार. प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार. (कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग). ६) राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या राज्यातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता.कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय (महसूल विभाग).

cmyk

## अग्रलेख

# तहात हरण्याची परंपरा कायम?

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शिगेला पोहोचलेला संघर्ष अचानकच जाहीर झालेल्या युद्धविरामानंतर निवळला, पण त्यानंतर देशात मात्र विविध प्रश्नांची एक नवी मालिकाच सुरू झाली आहे. मुळात अमेरिकेच्या अध्यक्षांनी परस्पर जाहीर केलेला संघर्षविराम भारताने अधिकृतरित्या मान्य केला आहे की नाही याविषयीच सुरुवातीच्या काळात संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. अनेक मीडियावाल्यांनासुद्धा हा युद्धविराम मान्य नव्हता, भाजपाच्या प्रवक्त्यांनीही हा अधिकृत युद्धविराम झाल्याचे मान्य करायला आडवळणाने का होईना नकारच दिलेला दिसला. पण त्यानंतर एक बाब पुढे आली की, भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशातील डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांशी संपर्क साधून या संघर्षविरामावर एक प्रकारे शिक्कामोर्तबच केले. त्यानंतर भारत सरकारच्या अधिकृत घोषणेच्या आधीच अमेरिकेचा अध्यक्ष आपल्या सोशल मीडियावर परस्पर संघर्षविरामाची घोषणा करतोच कसा, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. भारतीय सेना युद्धाच्या मोर्चावर अग्रेसर असताना अचानक असा अवसानघात मोदी सरकारने कसा काय स्वीकारला, असाही प्रश्न विचारला जाऊ लागला. या अचानक झालेल्या युद्धविरामावर देशात चौफेर नाराजी व्यक्त केली गेली आणि सरकारवर प्रश्नांचा भडीमार सुरू झाला.

हा युद्धविराम विनाशर्त झाला आहे काय, की काही अटींवर हा युद्धविराम झाला असाही प्रश्न उपस्थित झाला. जर ही तडजोड सशर्त स्वरूपात झाली असेल तर त्या अटी नेमक्या काय आहेत असा प्रश्न काँग्रेसनेही उपस्थित केला. पाकिस्तान चारही बाजूने घेरला गेलेला असताना भारताने युद्धविराम स्वीकारण्यापूर्वी पाकिस्तानवर काही अटी घालणे किंबहुना त्यांच्या देशात असलेले दहशतवादी भारताच्या हवाली करणे अशी तरी अट घालणे भारताला सहज शक्य असताना तशी अट का घातली गेली नाही असा प्रश्न विचारणारेही कमी नव्हते. हा संघर्षविराम होऊन चार दिवस झाले आहेत. पण भारत सरकारच्या जबाबदार पदावरील एकाही व्यक्तीने अजून त्याची अधिकृत घोषणा का केली नाही हा प्रश्नही अनुत्तरित राहिला आहे. आपण युद्धात जिंकतो आणि तहात हरतो अशी फार पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे असे सांगितले जाते, त्याचीच पुनरावृत्ती यावेळीही झालेली पाहायला मिळाली आहे. भारतीय सेना आपली कामगिरी चोख बजावत असताना, राजनैतिक पातळीवर मात्र भारताला तितकी दमदार कामगिरी करता आलेली नाही असे चित्र दिसले. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा अगदी पाकिस्तानसहित जगातल्या सगळ्याच देशांनी विरोध केलेला दिसला, अनेक राष्ट्रप्रमुखांनी पंतप्रधानांना फोन करून या घटनेचा निषेध केला. पण जेव्हा प्रत्यक्ष संघर्षाला तोंड फुटले तेव्हा मात्र एकाही देशाने अधिकृतपणे भारताची पाठराखण केली नाही, ही बाबही लख्खपणे समोर आली. इतिहासात भारत आणि पाकिस्तान यांच्यात अनेक वेळा थेट संघर्ष झाले. १९६५, १९७१ आणि अगदी अलीकडे कारगिल युद्धाच्या वेळी चीन कधीच पाकिस्तान बरोबर उभा राहिलेला दिसला नाही, पण यावेळी मात्र चीन अधिकृतपणे पाकिस्तानच्या पाठीशी असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. पाकिस्तानच्या स्वायत्ततेचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे, असे जाहीर वक्तव्य चीनकडून करण्यात आले. मोदी यांच्या दिशाहीन परराष्ट्र धोरणामुळे चीन आणि पाकिस्तानला एकत्र आणले गेले असल्याची जाहीर टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संसदेत केली होती ती या निमित्ताने खरी ठरली. ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा करण्याच्या आधी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षात आम्ही पडणार नाही अशी भूमिका घेतली होती. पण मग पडद्यामागून अशा काय हालचाली झाल्या की २४ तासांच्या आत अमेरिकन अध्यक्षांना यात मध्यस्थी करावी लागली याचाही उलगडा देशापुढे होणे गरजेचे ठरले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरू असतानाच्या काळातच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे पाकिस्तानने जे कर्ज मागितले होते त्यावर निर्णय व्हायचा होता, त्या ठिकाणी भारताने आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधांचा वापर करून पाकिस्तानला हा कर्जपुरवठा रोखण्याची खेळी करणे अपेक्षित होते. पण दुर्दैवाने तेथेही भारताच्या पदरी निराशाच आली. भारताच्या मागणीकडे कोणत्याही देशाने लक्ष दिले नाही, उलट चीन आणि अमेरिका यांनी पाकिस्तानला कर्ज देण्यासाठी आपले वजन खर्ची घातले आणि पाकिस्तानला विनासायास हे कर्ज मिळाले.

या घटनांचा नीट अन्वयार्थ लावला तर असे लक्षात येते की ज्याला आपण बॅक डोअर डिप्लोमसी म्हणतो त्यात आपण कमी पडलो. पाकिस्तानची खुमखुमी नरेंद्र मोदी यांच्यासारखे नेतृत्व निश्चित जिरवेल अशी अपेक्षा देशातील जनतेची होती. मोदी सरकारला देशातल्या सगळ्याच विरोधी पक्षांनी याबाबतीत एकमुखी पाठिंबा जाहीर केला होता. देशातल्या अनेक मुस्लीम नेत्यांनी आणि संघटनांनीही पाकिस्तानला कायमचा धडा शिकवा, त्यासाठी हीच वेळ योग्य आहे अशी जाहीर भूमिका घेतली होती. त्या अर्थाने संपूर्ण देश एकसंधपणे सरकारच्या पाठीशी उभा असताना मोदी सरकारला ऐतिहासिक कामगिरी नोंदवण्याची ही चांगली संधी चालून आली होती, पण आता आपण ती गमावल्यात जमा आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर भाजप आणि भाजपच्या नेतृत्वाला एका वेगळ्याच आव्हानात्मक स्थितीला सामोरे जावे लागणार आहे. गेली ७० वर्षे काँग्रेसने केलेल्या चुकांच्या अनुषंगाने वेगवेगळे प्रश्न उपस्थित करणारा भाजप आता या प्रश्नांना कसा सामोरा जाणार हे पाहावे लागेल.

# शेगांव येथे गायक राज रायते यांचा भव्य सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**श्री संत गजानन नगरी येथे बीड येथील उभारता गायक राज रायते यांचा तेली समाजाच्यावतीने राज्यस्तरीय भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी समाजातील मान्यवरांची उपस्थिती होती. याठिकाणी गायक राज प्रल्हाद रायते यांनी आपल्या सुमधुर आवाजात गीत सादर केले. जमलेल्या असंख्य समाज बांधवांनी यावेळी राज यांचे कौतूक केले. या गीताला इतका प्रतिसाद मिळाला की अक्षरश: कार्यक्रम झाल्यावर राज रायते सोबत फोटो काढण्यासाठी आणि ऑटोग्राफ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.**




राज रायते यांचे चाहते लांबलांबून त्यांच्या भेटीसाठी खास कार्यक्रमात उपस्थित राहिले. आपल्या कलागुणांनी परिपूर्ण असलेल्या राजला समस्त तेली समाज आज ओळखत आहे. या कार्यक्रमासाठी राज रायते यांचे कुटुंबही उपस्थित होते. तसेच मान्यवरांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती होती. राज रायते यांचा या कार्यक्रमात अनेकांनी सत्कार सुद्धा केला. आज संपूर्ण तेली समाजात राज रायते यांचे गीत गाजत आहे. व सर्व सोशल मीडियात राज रायते यांच्या गीताला लाखोच्यावर लोकांनी बघितले आहे.. या राज्यस्तरीय सत्कारामुळे राज रायते यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.. राज रायते यांचे जागोजागी गायनाचे कार्यक्रम ठेवण्यात येत आहेत.

# भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**


भारतीय बौद्ध महासभा तालुका याजलगावच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली त्या अनुषंगाने दि १ मे २०२५ ते ५ मे २०२५ या कालावधीत त्रिसरण बुद्ध विहार चिंचगव्हाण येथे महिला उपासिका शिबीर संपन्न झाले,४ मे २०२५ रोजी बुद्ध विहार संम्राट अशोक नगर येते अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर संपन्न झाले आणी दि ३ मे२०२५ पासुन चालु झालेले पुज्य भन्ते दिपरत्न यांच्या नेतृत्वात सांची बुद्ध विहार, डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचा समारोप दि १२ मे २०२५ सोमवार रोजी वैशाख पौर्णिमा या दिवशी सकाळी ८:०० वाजता डॉ आंबेडकर चौक ते सांची बुद्ध विहार आसी तथागत भगवान बुद्धाच्या मुर्ती ठेऊन भिख्खू संघासमवेत भव्य धम्मरॅली काढण्यात आली या रॅलीत तालुक्यातील धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते.या नंतर सांची बुद्ध विहार



येते पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्वचे जिल्हा अध्यक्ष बी बी धन्वे यांच्या हस्ते करण्यात आले या नंतर संघ भोजन होऊंन पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्त्यांचे पुज्यन पुज्य.भन्ते दिपरत्न व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा अध्यक्ष बी बी धन्वे,केंद्रीय शिक्षक एस बी मोरे ,ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे व सर्व जिल्हा पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमात श्रामणेर शिबीरातील शिबीरार्थीचे मनोगत झाली बीड जिल्हा पुर्वचे जिल्हा अध्यक्ष बी बी धन्वे व केंद्रीय शिक्षक एस बी मोरे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा संस्कार उपाध्यक्षा आद धन्वे ताई ,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, आशाताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव ,एन बी राजभोज जिल्हा संघटक बी सी डोंगरे,शोभाताई भोजने, शारदाताई तांगडे केन्द्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे, वंचित आघाडीचे नेते अंकुश जाधव ,अशोक पौळ, बसपाचे ऑड.अमोल डोंगरे, पत्रकार किसन भदर्गे,अभिमान वाघमारे,विलास साळवे,अशोक मगर,दिनेश निसर्गंध,अश्विन टाकणखार,सह विविध पक्षांचे पदाधिकारी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्तीत होते.या कार्यक्रमाच सुत्रसंचलन सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर सुत्रसंचलन गुलाब धाईजे यांनी केले तसेच या कार्यक्रमासह शिबीर यशस्वी करण्यासाठी दयानंद साळवे, नितिन डोंगरे,मोहन काकडे,बळीराम काकडे, भगवान डोंगरे,डि एस साळवे, समाधान साळवे, तात्यासाहेब साळवे,अमोल टाकणखार, कोमल डोंगरे,अनुराधाताई साळवे,मायाताई स्वामी,शारदाताई टाकणखार,वंदनाताई घनघाव, अनिकेत घनघाव, डी पी वाघमारे, डी पी पोटभरे, संभाजी धाईजे, सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व धम्म उपासक यांनी परिश्रम घेतले.

# पुर्वा लड्डा हिचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

**बीड । प्रतिनिधी**



येथील नामांकित शिक्षण संस्था, राजस्थानी सेवा समाज, बीड द्वारा संचलित, द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीडची इयत्ता दहावीची विद्यार्थीनी कु. पुर्वा संजय लड्डा हिने घवघवीत यश संपादन केले आहे.

दहावीच्या परिक्षेत कु. पुर्वा संजय लड्डा हिने ९३.६० गुण मिळविले असून शाळेतून सातवा क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल मुकूंदलाल लड्डा, जुगलकिशोर लड्डा, अशोककुमार मणियार जालना, जगदीशप्रसाद लखोटीया मंठा, राहुल जाजु कळंब, रामनिवास काबरा हिंगोली, द्वारकादास लड्डा, गोपाल लड्डा, गोविंद लड्डा, संजय लड्डा, पवन लड्डा, ओमप्रकाश सिकची, राजेश कासट, विशाल भराडीया, संकेत भुतडा, डॉ. श्रीनिवास भुतडा, संताष लड्डा, शिक्षक सोहनीसर यांच्यासह शिक्षकवृंदांनी कु. पुर्वाचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# संत बाळूदेव महाराज विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील आनंद चरिटेबल संस्था आष्टी संचलित.संत बाळूदेव महाराज विद्यालयाचा दहावी बोर्ड २०२५ परीक्षेत नेहमी प्रमाणे उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.दहावीचा शंभर टक्के निकाल लागला असून सर्व स्तरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे कौतुक होत आहे. या वर्षी शाळेमध्ये सागर किसन मामडगे : ८६.८० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला तर मोरे बाजीराव विष्णू याने ८३.८० टक्के घेऊन दुसरा व वाघमारे रितेश गौतम ७३.२० टक्के घेऊन तृतीय येण्याचा बहुमान पटकावला आहे.तसेच सर्वच उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार तथा आनंद चॅरिटेबल संस्था आष्टीचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भीमरावजी धोंडे ,तसेच डॉ. बाबासाहेब



आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ.अजय दादा धोंडे,अभय राजे धोंडे , प्रशासनाधिकारी डॉ.राऊत डी.बी.सर , प्रा.विधाते सर , मा.श्री माऊली बोडखे सर , मा.श्री. शेंडे सर, संजय शेठ कांकरिया ,अनिल जायभाय सर ( माजी सभापती ), महेंद्र नागरगोजे (प.स.सदस्य पाटोदा) स्वामी सानप , शिवाजी गर्जे , पत्रकार इद्रीस चाऊस, हमीदखान पठाण, दिगंबर नाईकनवरे,विजय जाधव, अजय जोशी , जावेद शेख , सतिष गर्जे , दयानंद सोनवणे, मुख्याध्यापक श्री.बोखारे मधुकर, देसाई सर, वाघ सर ,मोहळकर सर, शेख सर , बोडखे सर , थोरवे मॅडम , सचिन शिंदे, अमोल जाधवर, बाबासाहेब चव्हाण ,राम देसाई ,चंदनशिव गौतम . सर्व ग्रामस्थ पाटोदा ,महासांगवी , गीतेवाडी, यांनी सर्वच उत्तीर्ण मुलांचे कौतुक आणि अभिनंदन केले.

# दहावीच्या निकालात दहिफळच्या लेकीचा महाराष्ट्रात डंका

**सारणी । प्रतिनिधी**



**केज तालुक्यात दहिफळ (वड) येथील मुलगी आपल्या वडिलांच्या नोकरीमुळे धाराशिव येथे शिक्षण घेत आहे. तीने दहावी ला १००% पैकी १००% गुण मिळवत बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

दहिफळ वड (जि.बीड) येथील हिरामन मोराळे हे शिक्षक असून ते सध्या धाराशिव जिल्ह्यात ज्ञानदानाचे कर्तव्य करत आहेत. त्यामुळे आपल्या मुलांचे शिक्षण धाराशिव येथेच घेत आहेत. त्यांची मुलगी हर्षदा ही अभिनव इंग्लिश स्कुल येथे शिक्षण घेत आहे. यावर्षी ती दहावीला होती तिने १००% पैकी १००% गुण मिळवत आपल्या शाळेचे नाव उज्वल तर केलेच परंतु त्याचबरोबर बीड जिल्ह्याचेही नाव उज्वल केले आहे.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या जमिनींवर डाका

करण्यासाठी भगवान भोजने, भाऊ झिरपे यांनी मोठी मेहनत घेतली. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांची नाशिक येथील परिषदेची पुस्तिका यावेळी प्रकाशित केली.डॉ. अशोक ढवळे यांनी परिषदेचा समारोप केला. अखिल भारतीय पातळीवर जमिनी शेतकऱ्यांकडून काढून घेण्यासाठी सरकारच्या वतीने सुरू असलेल्या कारस्थानाचा त्यांनी तीव्र निषेध केला. राज्य सरकारने शेती शेतकऱ्यांकडून काढून घेण्यासाठी सुरू केलेल्या कारस्थानाचा निषेध करण्यासाठी १ जून रोजी राज्यात तीव्र आंदोलन करण्याची हाक त्यांनी दिली. जमिनीशी संबंधित प्रत्येक प्रश्नावर राज्य, जिल्हा, तालुका व स्थानिक पातळीवर आरपार लढा करण्याचे त्यांनी आवाहन केले.

------------

### मोदींचा पाकला

गाडलं. भारतीय सैन्याने पाकिस्तानात घुसून मारलं. ज्या पाकिस्तानी सैन्यावर हे दहशतवादी अवलंबून होते, त्यांना भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदलाने धूळ चारली आहे. तुम्ही पाकिस्तानी सैन्याला असेही सांगितले आहे की, पाकिस्तानमध्ये अशी कोणतीही जागा नाही जिथे दहशतवादी बसून शांततेत श्वास घेऊ शकतील. आम्ही घरात घुसून तुमच्यावर हल्ला करू आणि तुम्हाला पळून जाण्याची एकही संधी देणार नाही. आपल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा विचार करून पाकिस्तान बरेच दिवस झोपू शकणार नाही, असे म्हणत भारताकडे डोळे वटारून बघाल तर खात्माच होणार असा स्पष्ट इशारा मोदींनी पाकिस्तानला दिला आहे.

-------------

### माजी उपसभापती सुशिल साळुंके

सुशिल साळुंके व इतर सहा आरोपीविरुध्द पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे गुन्हा दाखल आहे.आरोपी सुशिल साळुंके याची आई सरपंच असून फिर्यादी व फिर्यादीच्या भावाने ग्रामपंचायत निवडणूकीत आरोपीच्या आई विरुष्द प्रचार केला होता तसेच फिर्यादीने ग्रामपंचायत कारभाराविरुध्द उपोषण केले होते. आमच्या विरोधात उपोषण का करतोस या कारणावरुन मुशिल साळुंके व इतर ६ आरोपींनी फिर्यादीच्या दुकानात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन फिर्यादीला लोखंडी रॉड व दगडाने मारहाण केली होती.दुकानातील वस्तुंची मोडतोड करून आर्थिक नुकसान केले होते. दरम्यान सदरील प्रकरणी पोलिसांना ते हवे होते.उच्च न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता दरम्यान पोलिसांसमोर आत्मसमर्पण होण्याशिवाय त्याला पर्याय नसल्याने त्याने हा मार्ग स्वीकारला,त्यानुसार सुशिल साळुंकेनी आत्मसमर्पण केल्यानंतर पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने सुशिल साळुंकेना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

----------------

### दहावीचा निकाल जाहीर

या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.१० आहे. यामध्ये कोकण विभागाचा सर्वाधीक निकाल लागला असून नागपूर विभागाचा सर्वात कमी निकाल लागला आहे. दुसरीकडे यंदा पुन्हा मुलींनीच बाजी मारली आहे. लातूर पॅटर्नचा यंदाही म्हणावा तेवढा निकाल दिसला नाही. कारण, राज्यातील ९ विभागांपैकी लातूर विभागाचा निकाल यंदा शेवटून दुसऱ्या क्रमांवर असून ९२.७७ टक्के एवढा तो आहे. मात्र, लातूरमधील ११३ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवल्याने पुन्हा एकदा लातूर पॅटर्नची चर्चा होताना दिसून येत आहे. राज्यात एकूण २११ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले आहेत.

-------------

### पंकजा मुंडेंचा ऐतिहासिक

करण्यात आली आहेत. त्यामुळे एकत्रित पशुसंवर्धन विभागांतर्गत रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तीन हजार पेक्षा जास्त पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून नजिकच्या काळात सदर पदे भरली जाणे अभिप्रेत आहे. पशुसंवर्धन विभागातील मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा, यासाठी पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील प्राधान्याने भरावयाची पदे निश्चित करण्यात आली आहेत. या पदांवर बदलीने पदस्थापना करण्यासाठी बदलीपात्र अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्यासाठी समुपदेशनाची कार्यपध्दती अवलंबण्यात येणार आहे. त्याव्दारे बदलीपात्र अधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम व जेष्ठतेनुसार उपलब्ध पदांमधून त्यांच्या पसंतीचे ठिकाण निवडण्याची संधी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे. समुपदेशनाने बदलीची कार्यपध्दती पार पाडताना ती पारदर्शकपणे पार पाडली जाईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून यामध्ये बदलीसाठी निर्धारित करण्यात आलेली पदे, दिव्यांग, गंभीर आजार असलेले कर्मचारी, असक्षम पाल्य, विधवा किंवा परित्यक्ता असलेल्या महिला, पती-पत्नी एकत्रिकरण अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बदलीपात्र अधिकाऱ्यांची वर्गवारीनिहाय जेष्ठता यादी व बदलीसाठी उपलब्ध पदे यांची यादी विभागाच्या पशुसंवर्धन संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याची लिंक सर्व संबंधित अधिकाऱ्यांनाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर वर्गवारीतील जेष्ठ अधिकाऱ्यांस बदलीचे ठिकाण निवडण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

-------------

### रोहा बलात्कार प्रकरणातील निकालावर

शहरासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात या घटनेबाबत संताप व्यक्त केला जात असून, मंगळवारी तालुक्यातील सकल मराठा समाजाकडून या घटने संदर्भात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. खरे मुख्य आरोपी लपवून आदिवासी तरुणांना पुढे करण्यात आले आणि राजकीय हस्तक्षेपामुळे खऱ्या गुन्हेगारांना वाचवण्यात आले, असा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. या निर्णयामुळे पीडितेच्या कुटुंबावर अन्याय झाला आहे, अशी भावना नागरिकांमध्ये आहे. रोहा शहरात पीडित मुलीच्या कुटुंबासह तालुक्यातील सकल मराठा समाजाकडून या घटने संदर्भात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी आरोपीला फाशी झाली पाहिजे, अशा घोषणा देत महिलांनी संताप व्यक्त केला. या जनआक्रोश मोर्चात असंख्य नागरिक सहभागी झाले होते. महिलांनी देखील संतापाची भावना व्यक्त करत या प्रकरणात पीडित मुलीला योग्य न्याय मिळावा, अशी सरकारकडे मागणी केली आहे. या संपूर्ण प्रकरणावर महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी, ''हे प्रकरण न्यायालयीन असल्याने आम्हाला यावर काही जास्त भाष्य करणे किंवा बोलणं बंधनकारक आहे. परंतू, आम्ही सदर कुटुंबाला न्याय देण्याकरिता उच्च न्यायालयात लवकरात लवकर अपील दाखल करणार आहोत. पीडित मुलीला व तिच्या कुटुंबाला न्याय देण्याकरता आम्ही सर्वच कटिबद्ध असून मी या कुटुंबासोबत आहे,'' असे सांगितले.

**सकल मराठा समाज आणि गावकऱ्यांचा गंभीर आरोप**

पुराव्यांची पडताळणी, साक्षीदारांचे जबाब आणि डीएनए चाचण्या यात गंभीर त्रुटी आढळल्या. पोलिसांनी सात आदिवासी तरुणांना ताब्यात घेतले, पण ठोस पुरावे गोळा करण्यात अपयश आले. पोलिसांनी जाणीवपूर्वक तपास ढिसाळ ठेवला आणि खऱ्या आरोपीला कदाचित प्रभावशाली व्यक्तीला वाचवण्यासाठी आदिवासी तरुणांना अडचणीत टाकले, असा सकल मराठा समाज आणि गावकऱ्यांनी आरोप केला आहे. याशिवाय पोलिस आणि राजकीय नेत्यांनी मिळून हा कट रचला आणि पुरावे नष्ट केले, असाही गावकऱ्यांनी दावा केला आहे.

-----------

### शेतकरी कर्जमाफीवरून राजू

हरभरा, उत्पादक शेतकऱ्यांचं नुकसान झालं. त्यामुळं जवळपास १५ हजार कोटींचं शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे,'' असंही शेट्टी म्हणाले. महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, भावांतर योजना लागू करण्याचं आश्वासन दिलं होतं. तसेच सोयाबीन ६ हजार रुपये दर देण्याची ग्वाही दिली होती. परंतु निवडणुकीनंतर राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलेली आश्वासन पूर्ण केली नाहीत. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. यावरूनच आश्वासन पूर्ण करता येत नव्हतं तर सातबारा कोरा करण्याचं आश्वासन का दिलं, असा सवालही शेट्टी यांनी उपस्थित केला आहे. राज्यात मागील दोन आठवड्यापासून विविध भागात अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांना पंचनामे करून तातडीने मदतीची अपेक्षा आहे. यावरूनही राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका केली आहे. तसेच ठिबक सिंचनाचे अनुदान रखडले आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांनीच संघर्ष करण्याचा निर्णय घेतल्याचं शेट्टी म्हणाले.

-------------

### कृत्रिम वाळू धोरणास

मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार जिल्ह्यात ५० व्यक्ती/संस्थांना एम-सँड म्हणजेच कृत्रिम वाळू युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच एम-सँड तयार करणाऱ्या युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यात फिरते पथक योजना सुरू करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. रस्त्यावर राहणाऱ्या किंवा भटकंती करणाऱ्या बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी फिरते पथक कार्यरत असणार आहेत. तर राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल देखील मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला आहे. राज्य सरकारने समितीचा हा अहवाल स्वीकारला. त्यानुसार, राज्य सरकारवर ८० कोटींचा भार पडणार असल्याची माहिती आहे.

--------

### सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर

कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले असून बोगस बी-बियाणे शहरात येते. त्यावर धाडसत्र दाखवले जाते. मात्र, अपेक्षित म्हणावी तशी कारवाई होत नाही. जे पेरतात त्यांचे होणारे नुकसान होते. त्याची वसुली झाली पाहिजे, असा नियम आहे. त्याचे पालन होत नाही. तसेच, बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाई झालेली दिसत नाही. त्यासंदर्भात प्रशासनाला सक्त सूचना दिल्या. स्कॉड निर्माण करून धाडी टाकण्यास सुरवात करण्याचे सांगितले आहे असे संजय शिरसाट म्हणाले.

-------------

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १४ मे २०२५



## श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम; १००% गुण घेऊन ५ विद्यार्थी उत्तिर्ण

माजलगाव । प्रतिनिधी

नुकताच दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९७.०२% लागला असून १००% गुण घेऊन ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत,९०% पेक्षा अधिक गुण घेऊन ८९ विद्यार्थी, विशेष प्राविण्य १४५ विद्यार्थ्यांनी मिळविले आहेत. प्रथम श्रेणीत ७७, द्वितीय श्रेणीत ६१ तर तृतीय श्रेणीत १४ विद्यार्थी गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे,श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी,कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे,सदाशिव ढगे,कमलाकर झोडगे,परमेश्वर आदमाने,दहावी प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर, कार्यालय प्रमुख संतोष लवडकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# साधू- संतांचा आर्शिवाद मिळाला की अनेक गोष्टींची प्राप्ती होते - ह.भ.प. सुरेशानंदजी शास्त्री

## श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाचा पहिला नारळी सप्ताह आडगाव येथे उत्साहात, नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यास भाविकांचा जनसागर उसळला


गेवराई । प्रतिनिधी

जीवनात प्रत्येकाशी प्रेमाने आणि आनंदाने रहा. जीवनात कुठल्याच गोष्टी कायमस्वरूपी राहत नाहीत म्हणून कुणाशीही कायम विरोधात राहू नका एकमेकांशी प्रेमाने आणि आनंदात रहा तसेच परमार्थात खरे सुख मिळते म्हणून ज्ञानयज्ञ सप्ताहात येवून भजन , कीर्तनाचे श्रवण करा तसेच जीवनात साधू संतांचा आर्शिवाद मिळाला की अनेक गोष्टी प्राप्त होतात असे प्रतिपादन श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाचे महंत हभप सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले.

गेवराई व शिरुर (का) तालुक्याच्या सिमेवर असलेल्या श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाच्या पहिल्या नारळी सप्ताहाचे पाथर्डी तालुक्यातील आडगाव येथे महंत सुरेशानंद महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सोमवार दि.१२ मे रोजी महंत सुरेशानंदजी म. शास्त्री यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने सांगता झाली. यावेळी त्यांनी संत नामदेव महाराज यांच्या दु:खाची निवृत्ती सुखाचे ते सुख । पाहतां श्रीमुख गोविंदाचे ।।१।। रंगणी रांगत गुलगुल बोलत ।असुर रूळत चरणांतळी ।।२।। नामा म्हणे हाती लोणीयाचा उंडा । गौळणी त्या तोंडा भुललिया ।।३।। या अभंगावर सुंदर असे निरुपण केले. यावेळी व्यासपीठावर श्रीक्षेत्र सालसिध्द बाबा संस्थानचे महंत हनुमंत महाराज शास्त्री, आ.गोपीचंद पडळकर, आ. सुरेश धस , आ.मोनिकाताई राजळे, माजी आ.रामराव वडकुते , शिवदास बीडकर, भाजपा जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले, शारदाताई पांढरे , अशोक चोरमले, भारत शिंगाडे, बळीराम खटके , शिवप्रसाद खेडकर, एकनाथ हाटकर , तुकाराम



हराळे यांच्या सह आदी संत- महंत टाळकरी , वारकरी , मृदंगाचार्य, गायणाचार्य, भालदार ,चोपदार, विणेकरी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान पुढे बोलताना सुरेशानंदजी शास्त्री म्हणाले की, जीवनात साधू संतांच्या आशीर्वादाची गरज आहे. आज खऱ्या अर्थाने साधू संतांच्या कृपेने भव्य दिव्य सप्ताह झाला. हे सर्व श्रेय आडगावकराचे आहे. तसेच आई वडिलांची , साधू संताची सेवा करा असे आवाहन त्यांनी शेवटी बोलताना व्यक्त करुन श्रृंगऋषी गडाच्या पहिल्या नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता झाली, सांगता सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी गडाचे टाळकरी, वारकरी, मृदंगाचार्य, गायणाचार्य , भालदार, चोपदार, विणेकरी सह पंचक्रोशीतील भजनी मंडळ उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ मंडळी, आडगाव यांनी आठ दिवस परिश्रम घेतले.



### तन मन धनाने आडगावकरांनी पहिला नारळी सप्ताह यशस्वी केला;सुरेशानंद शास्त्रींनी केले कौतुक

पाथर्डी तालुक्यातील आडगाव येथील ग्रामस्थांनी तन- मन धनाने नारळी सप्ताहात काम सप्ताह यशस्वी केला. पहिल्याच नारळी सप्ताहाची सर्वत्र चर्चा असून महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार मंडळींनी उपस्थित राहून आडगावकरांच्या नियोजनाचे कौतुक केले. महिला मंडळ, तरुणांसह जेष्ठ मंडळींनी खुप सुंदर सेवा केली. श्रृंगऋषी महाराजांचे, वै. तुकाराम महाराजांचे आपल्या सर्वांना आर्शिवार्द आहेत असे सांगून महंत सुरेशानंदजी महाराज यांनी आडगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे उत्कृष्ट नियोजनाबद्दल तोंडभरुन कौतुक केले. तर पुढचा २०२६ चा दुसरा नारळी सप्ताह नेवासा तालुक्यातील माका येथे होणार असून येथील ग्रामस्थांना महाराजांकडून नारळ देण्यात आले.

### नारळी सप्ताहात आध्यात्मिक सेवा घडते - आ.गोपीचंद पडळकर


नारळी सप्ताहाच्या माध्यमातून भजन , भोजन आध्यात्मिक सेवा घडते आणि परमार्थिक दिवाळी सात दिवस साजरी केली जाते. तसेच महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे . संतांची मांदियाळी येथे आहे. अहिल्यानगर, बीड जिल्ह्यात थोर संत होवून गेलेले आहेत. संतांनी आपल्याला भेदभाव न करता सोबत चालण्याचा मंत्र दिलेला आहे. समाज सुधारण्यासाठी हे नारळी सप्ताह होतात . आणि सप्ताहात लोक निव्यर्सनी होतात लोकांमध्ये बदल घडतात या सप्ताहाच्या माध्यमातून चांगली पिढी निश्चित घडेल. तसेच सप्ताहात मनोभावे सेवा केली पाहिजे. तसेच श्रृंगऋषी गडाच्या सेवेसाठी आपण कायम प्रयत्नशील राहू असेही शेवटी बोलताना त्यांनी सांगितले.

### श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गडाच्या विकासासाठी कायम प्रयत्नशील - आ. सुरेश धस

आडगावकरांचे मनापासून कौतुक आहे. या ठिकाणी सात दिवस हा नारळी सप्ताहाचा उत्साह येथे पार पडत आहे. श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गडावर आज चांगली विकासकामे झाली आहेत. मी १ कोटी रुपयांचा निधी गडावर दिलेला आहे. श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गडाच्या विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील असून चांगल्या सोयीसुविधा भक्तांना मिळाल्या पाहिजेत अशी सोय आम्ही करु गडाचे महंत सुरेशानंदजी महाराज यांनी चांगले काम केले आहे. आडगाव ने इतिहास घडवला आहे. गडाचा पहिला नारळी सप्ताह उत्साहात साजरा केला. एक नारळी सप्ताह आष्टीला द्या मोठ्या उत्साहात आम्ही पण साजरा करु अशी मागणी केली. तर पडळकर आणि आम्ही बंडखोरी करणारे आम्ही लोक आहोत जिथे अन्याय होईल तिथे आम्ही बोलत असतो कारण आम्ही संघर्षशील लोक आहेत.

## जवाहर विद्यालयाची यशस्वी परंपरा कायम





माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९५.६५ टक्के लागला असून रोहिणी पवार ९८.२०,शाहरूख तांबोळी ९६,समृद्धी जाधव ९५.४०, श्रावणी हालबुर्गे ९३,ऋतुजा ठेंगल ९२, नंदिनी खिरे ९१.२०पुर्वा सिरसट ९०.२०,सोफियान शेख ९०.२० असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष अॅड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख, उपाध्यक्ष अॅड.आर. डी. भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी. देशमुख,संचालक शिरीष देशमुख, डॉ.सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## माजी सभापती अशोक डक यांच्या प्रयत्नाने छोटेवाडी (रामनगर तांडा) चा पाणीप्रश्न मिटला

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी (रामनगर तांडा) येथील माजी सरपंच विनायकराव राठोड यांचे काही दिवसांपूर्वी दुखः द झाले होते त्यामुळे मुबंई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक हे त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी गेले असता त्यांना गावातील युवकांनी व नागरिकांनी गावातील पाणी प्रश्नाबाबत चर्चा केली असता त्यांनी ताबडतोब स्वखर्चाने रोजी बोर घेऊन दिला व त्या बोअर ला पाणी पण भरपूर प्रमाणात लागले आहे व १२ मे रोजी अशोक डक यांनी पाणी मोटार,पाईप,व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य देऊन गावातील नागरिकांसाठी पिण्याचा



पाण्याचा मिटवल्याने मुबंई कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांचे गावातील व रामनगर (तांडा) येथील नागरिकांनी सत्कार करून आभार मानले यावेळी छोटेवाडी गावचे सरपंच अंगदराव कटके,वैजनाथ कटके,देवींनाथ चव्हाण, अशोक माळेकर,लक्ष्मण चोरगे,महेश सोळंके,सतीश राठोड,वसंत राठोड,राहुल मापाडे,राजेश राठोड,आदी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### बाळराजे पवार जनसेवेत

पार केली बाळराजे दादा पवार यांच्या फोटो वर जनतेने कित्येक वर्षे नगरपालिकेचे सत्ता पवार कुटुंबाच्या ताब्यात दिली घरातला करता कुटुंबातला तरुण जेलमध्ये असताना कुठलाच चेहऱ्यावर दु:ख न ठेवता गेवराईकरांची कुटुंब प्रमाणे या पवार कुटुंबाने सेवा केली याप्रमाणे पडीत राजकारणी घराण्याला २०१४ मध्ये हदरा देत बाळराजे दादा पवार यांच्या विश्वासावर बंधु लक्ष्मण आण्णा पवार यांना मोठ्या मताधिक्याने दोनदा आमदार केले आण्णांनी प्रमाणीक पनाने जनतेची सेवा केली बाळराजे दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्याचा सर्वांगीण विकास केला गेल्या दोन दशकांनंतर गेवराईचा बाळराजे राजा दादा कायमचा मुक्त झाला असून आता जनतेमध्ये दाखल झाला आहे गेवराई मध्ये बाळराजे दादा पवार यांनी पाऊल टाकताच तालुक्यातील नागरिकांची रीग पवार कुटुंबाच्या घराकडे लागली असून बाळराजे दादा यांना भेटण्यासाठी बोलण्यासाठी फोटो काढण्यासाठी नागरिक उत्सुक आहेत गेवराईकर बाळराजे दादा पवार यांच्या राजकीय भूमिका कडे लक्ष वेधून आहे गेवराई मध्ये पवार कुटुंबाचा दरारा कायम चालेला आहे असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

### संत कृपने व संत सहवासाने

दरेकर आदि मान्यवर उपस्थित होते.ह.भ.प.सुरेखाताई मेटे महाराज म्हणाल्या की, पारमार्थिक जीवनात उन्नती करायची असेल तर जीवनात भक्ती,ज्ञान आणि वैराग्याची गरज आहे.भक्ती, ज्ञान,वैराग्याची व्याख्या सांगताना तुकाराम महाराजांनी स्पष्ट शब्दात सुत्रात्मक भक्ती म्हणजे नमन,वैराग्य म्हणजे त्याग आणि ज्ञान म्हणजे ब्रम्हीभोग याची परिणीती ब्रम्हतनू झाली पाहिजे. पारमार्थिक क्षेत्रात वाटचाल करताना एकतर वेदाच्या मागे गेले पाहिजे अथवा संताच्या मागे गेले पाहिजे तरच परमात्म स्वरुपाची प्राप्ती करून घेता येते.मनाच्या मागे जाण्यात मानवाची अधोगती आहे.दया क्षमा शांती तेथे देवाची वसती म्हणजे ज्यांच्या ठिकाणी दया,क्षमा, शांती हे गुण नांदत आहेत तेथे साक्षात देवाची वस्ती असते.तो देह देवाचे घर असते. देवच वस्तीला आले म्हटल्यावर त्यांना सहजच आत्मरामाच्या स्वरुपाचा साक्षात्कार झाला आहे.म्हणून त्यांना अवघ्या विश्वात एका आत्मरामा शिवाय दुसरे काहीच दिसत नाही म्हणून आपण अज्ञानी जीवाने सुद्धा दया,क्षमा, शांती या गुणांचा अंगीकार करावा असेही उपदेश केला. निंदा,द्वेष ज्या अभिमानाच्या संगतीने घडतात त्या अभिमाला जाळून टाका.गर्व,अहंकार, अभिमान सोडुन द्या.नामचिंतनाने अहंकार नष्ट होत असतो.याकरीता हरिनाम घ्यावे असे ह.भ.प.मेटेताई महाराज यांनी सांगितले.

### जात वैधता प्रमाणपत्र

२०२५ पासून जिल्हाधिकारी,बीड कार्यालयासमोर सर्व सबंधितांना सोबत घेऊन आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिनांक १३ मे २०१९ रोजी उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन शैलेश सूर्यवंशी यांना प्रत्यक्ष भेटून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे व सरपंच परिषदेचे अंबादास गुजर, बाळासाहेब गावडे तसेच बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी दिला आहे.

### शालांत परीक्षेत गोदावरी

संस्कृत विषयात १७ विद्यार्थिनींनी शंभर गुण घेतले आहेत या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन यो.शि.संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे,अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर पदाधिकारी जी.बी.व्यास,ऍड. जगदीश चौसाळकर,कमलाकर चौसाळकर,डॉ.शैलेश वैद्य,भीमाशंकर शेटे, जयश्री देशपांडे,ऍड. कल्याणी विर्धे,मुख्याध्यापिका एम.एस.कुलकर्णी, शालेय पदाधिकारी, शिक्षिका,शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी आदींनी केले आहे.

### माहेश्वरी समाजाच्या वतीने

सोसायटीने ही लस माफक दरात उपलब्ध करून दिली आहे, याचा लाभ माहेश्वरी समाजातील सर्व लाभार्त्यांनी घ्यावा असे आव्हान त्यांनी केले. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तप्रसाद लोहिया, संचलन सतीश तोष्णीवाल यांनी केले तर आभार विजय नावंदर यांनी मानले. कार्यक्रमाचा शेवट भारतीय शहीद जवान, पहलगाम मधील यात्रेकरु शहिदांना श्रद्धांजली देवून राष्ट्रगीताने झाला. या लसीकरण कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील एकूण १०५ जणांचे लसीकरण करण्यात आले. या लसीकरण कार्यक्रमासाठी जिल्हा सचिव जगदीश जाजू, तालुकाध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, डॉ. मनिषा भुतडा, डॉ. अनिल भुतडा, किरण भंसाळी, शिवकन्या रांदड, रेणू झंवर, उमा बजाज, संतोष भंडारी, कांतीलाल चोकडा, रामानुज मुंदडा, किशोर बाहेती, संजय सोनी, भुतडा, अंबाजोगाई तालुका माहेश्वरी महिला संघटन व अंबाजोगाई तालुका माहेश्वरी युवा संघटन यांचे सहकार्य लाभले.

### मोदी ज्वेलर्स आयोजित

उर्मिला सोनवणे , कीर्ती बोकण आणि राजकुमारी किर्दंत

(विभागून) यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या उखाणा स्पर्धा व बक्षीस वितरण प्रसंगी सुनीता राजकिशोर मोदी, सरोज भूषण मोदी, प्राजक्ता प्रमोद गावरस्कर , रचना मोदी ,डिंपल संकेत मोदी , श्रीमती बिराजदार यांच्या उपस्थिती मध्ये सर्व सहभागी स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या.याप्रसंगी मोदी ज्वेलर्सचे संचालक भूषण मोदी , प्रमोद गावरस्कर , विनायक मुंजे यांच्यासह अनेक पुरुष व महिला ग्राहक मोठ्या उपस्थित होते. या अनोख्या स्पर्धेचे परीक्षक म्हणून

योग प्रशिक्षक मंदाकिनी गित्ते आणि आनंद क्षेमकल्याणी यांनी काम पाहिले तर मनीषा क्षेमकल्याणी यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोदी ज्वेलर्सच्या सर्व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

## अंबाजोगाईत बुद्ध जयंतीनिमित्त पुरस्कार वितरण व बुद्ध धम्मगीतांचा भव्य कार्यक्रम

## महापुरूषांची स्मारके ही त्यांच्या विचारांची प्रतीकं असावीत - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महापुरूष ही कोण्या एका जातीधर्माचे नसतात,त्यांचं कार्य हे सर्व समाजाच्या उत्थानाच कार्य असत त्यामुळे महापुरूषांना कोण्या एका जातीच्या जोखडात न बांधता त्यांच्या कार्याचे, त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम त्यांच्या अनुयायांनी करावे असे प्रतिपादन क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले स्मारक समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

बुद्ध जयंतीनिमित्त महात्मा फुले स्मारक समिती तर्फे महापुरूषांचे विचार मांडणारा एक भव्य आणि प्रेरणादायी संगीत रजनी तथागत गौतम बुद्ध जयंतीनिमित्त महात्मा फुले स्मारक स्थळी संपन्न झाली. या कार्यक्रमात ते अध्यक्षीय स्थानावरून आपले मनोगत व्यक्त करत होते. यावेळी क्रांतिकारी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.राजेश इंगोले , प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.योगेश सुरवसे,बी.के.मसने, संजय साळवे आणि प्रमुख मार्गदर्शक व्याख्याता म्हणून प्रा.डॉ.किर्तीराज लोणारे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी बुद्ध आस्तिक नाही बुद्ध नास्तिक ही नाही, बुद्ध वास्तविक आहे. बुद्ध आचार, विचार, जगण्याची रीत आहे तो मुक्तीदाता नाही तो मार्गदाता आहे असे सांगत बुद्ध मनाच्या




बदलावर विश्वास ठेवणारा जगातला पहिला मानसोपचार तज्ञ असल्याचे सांगितले. बुद्ध जयंती निमित्त मार्गदर्शन करतांना प्रा.किर्तीराज लोणारे यांनी अत्यंत सोप्या भाषेत पंचशील आणि आर्य अष्टांगिक मार्ग याचा आपल्या जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम यावर प्रकाशझोत टाकला.

प्रा.डॉ.योगेश सुरवसे यांनी जगाला आता युद्ध नको तर बुद्ध हवा असे सांगत मानवी कल्याणाचा विचार तथागत गौतम बुद्धांनी आम्हाला दिला आहे तो सर्वांनी आचरणात आणावा असे आवाहन केले. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सहशिक्षक बी.के.मसने यांनी महात्मा गौतम बुद्ध यांच्या विचारांचा वारसा संत संप्रदायाने जपला तोच वारसा छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहुजी महाराजांनी चालवला त्याच वैचारिक वारसा आता समाजाने चालवून प्रबोधनाची चळवळ गतिमान केली पाहिजे असे वक्तव्य केले. कार्यक्रमात ईश्वरी खाडे हिला विद्यापीठात केलेल्या नृत्याविष्काराबद्दल विशेष सन्मानाने गौरविण्यात आले तर किशोर भदरगे याने एमबीए यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल समितीच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. धम्म गीत सादर करणाऱ्या गायकांमध्ये सुप्रसिद्ध गायकप्रा राजकुमार ठोके, महाराष्ट्राचे महागायक बळीराम उपाडे, अमोल तरकसे आणि डॉ.राजेश इंगोले यांचा समावेश होता. त्यांच्या विविध गीतांच्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष रामेश्वर खाडे, गणेश राऊत, विजय कचरे, डॉ.किरण चक्रे, डॉ.अनिल नरसिंगे, डॉ.सुनील नरसिंगे, अरूण कदम, आदित्य कदम व संजय साळवे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. मिलिंद ढगे यांनी केले. या प्रसंगी महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारीव परिसरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने दहावी परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.







या बाबत अधिक माहिती अशी की

फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाइन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा शेकडा ९४.३३ टक्के इतका लागला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ५८ परीक्षार्थी परीक्षेस बसले होते. त्या पैकी ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या ५५ पैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामुळे शाळेचा शेकडा ९४.५४% टक्के निकाल लागला आहे. यामध्ये कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर चि. प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि चि. शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.

कु. सपना शिंदे हिने ९०.२० गुण मिळवून चौथा क्रमांक चि. जैद सय्यद ९०.०० गुण घेत पाचवा क्रमांक मिळविला तर कु. शुभांगी सोलनकर हिने ८९.६० गुण घेत सहावा क्रमांक मिळवला आहे. दहावी परीक्षेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा तथा जेष्ठ मार्गदर्शिका सौ. सुदामतीताई वाघ मॅडम, संस्थापक सचिव तथा जेष्ठ मार्ग दर्शक श्री. गोविंदराव वाघ साहेब, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर , सचिव श्री. नामदेवराव वाघ सर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम गणेश श्री गुजर सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, शिदोड येथील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरून...

### कोट्यवधींच्या पाणी योजना

अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून त्यात म्हटले आहे की, जलजीवन मिशन अंतर्गत हर घर जल

चार वर्षांपासून कामे सुरूच मुदतवाढीसाठी आर्थिक उलाढाल ?

कार्यारंभ आदेशानंतर चार वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप या योजनेमार्फत सुरू असलेली कामे पूर्णत्वास गेलेली नसून मुदतवाढीचे प्रस्ताव थातूरमातूर कारणे दाखवून मोठ्या आर्थिक उलाढालीतून मंजूर करण्यात आलेले आहेत अथवा तशा हालचाली सुरू आहेत, असा आरोपही कैलास दरेकर यांनी निवेदनात केला आहे.

ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महात्वाकांक्षी योजना आहे. आष्टी मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार या तीन तालुक्यांतील गावांना कोट्यावधी जल जीवन चे काम करण्यात आले आहे मात्र काही गावांमध्ये जल जीवन च्या कामांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे समोर येत असून शासनाने खेड्यापाड्यातील लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्याकरता काही कोटीचा निधी दिला असून मात्र निकृष्ट दर्जाचे कामे करून ठेकेदार ही योजना गिळणकृत करत आहेत. यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकाऱ्याने सीओ ओ साहेबांनी लक्ष घालून निकृष्ट काम केलेल्या ठेकेदारांची परवाने रद्द करून त्यांची कामाची बिले अदा करू नये असे कैलास दरेकर यांनी आपल्या पत्रकात म्हटले आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार, दि. १४ मे २०२५
४

# मुंबई - पुण्याचा भाजीपाला ८ दिवसच बंद करा, सरकार तुमच्या दारात येईल - रविकांत तुपकर





पंढरपूर : शेतकऱ्यांना कर्जमाफी करुन घ्यायची असेल तर एकत्रित येऊन मुंबई पुण्याचा भाजीपाला आणि शेतमाल आठ दिवसासाठी बंद करु, मग पहा सरकार तुमच्या दारात येईल, असा इशारा क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रमुख रविकांत तुपकर यांनी दिला. असे केले तर कर्जमाफी असो किंवा शेतमालाला भाव मिळणे असो या सर्व मागण्या मान्य होतील असे तुपकर म्हणाले. पंढरपूर येथे झालेल्या छावा क्रांतिवीर सेनेचे ११ व्या राष्ट्रीय महा धिवेशनात तुपकर बोलत होते.

यापूर्वी मुंबई - पुण्याचे दूध बंद करण्याच्या आंदोलनाचा मीच मास्टरमाइंड होतो असे रविकांत तुपकर म्हणाले. त्यानंतर सरकारने लगेच पाच रुपये लिटर मागे भाववाढ दिल्याची आठवण तुपकर यांनी सांगितली. याच पद्धतीने पुन्हा एकदा राज्यभरातील सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येत मुंबई पुण्याचा भाजीपाला आणि शेतमाल आठ दिवस बंद केला तर कर्जमाफी असो किंवा शेतमालाला भाव मिळणे असो या सर्व मागण्या मान्य होतील असेही तुपकर यांनी सांगितले. पंढरपूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हे अधिवेशन झाले.

राज्यभरातील प्रतिनिधी या अधिवेशनासाठी उपस्थित होते. यावेळी बोलताना छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेशाध्यक्ष करण गावकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर तोफ डागली. अजित पवार यांचा मगरुरपणा आता बंद करावा लागणार आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत त्यांनी तातडीने माफी मागावी अशी मागणी गायकर यांनी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने अजित पवार यांचा राजीनामा घेण्याची मागणीही त्यांनी केली. या अधिवेशनासाठी शरद पवार गटाचे माढ्याचे आमदार अभिजीत पाटील आणि पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे भाजप आमदार समाधान आवताडे उपस्थित होते. या महाअधिवेशनात शेतकऱ्यांना कर्जमाफी, मराठा आरक्षण, वारकऱ्यांना पेन्शन, राज्यातील मराठी शाळांना स्वायत्तता असे अनेक ठराव मंजूर करण्यात आल्याचे प्रदेशाध्यक्ष करण गायकर यांनी सांगितले.

सरकारीने जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत

महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या आधी शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार असे जाहीर केले होते. तसे जाहीरनाम्यात आश्वासन देखील दिले होते. मात्र, अर्थसंकल्पात देखील कर्जमाफीबाबत काही सांगण्यात आले नाही. त्यामुळं शेतकरी आक्रमक होताना दिसत आहे. निवडणुकीत सरकारनं दिलेली आश्वासने पूर्ण न केल्याची टीका शेतकरी करत आहेत.




### महत्वाच्या घटना

१७१८ : जगातल्या पहिल्या मशीन गन बंदूकेचे पेटंट जेम्स पक्कल यांनी घेतले.
१७३० : रॉबर्ट वॉल्पोल युनायटेड किंग्डमचे पहिले पंतप्रधान झाले.
१८११ : पॅराग्वेला (स्पेनकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१८३६ : सूर्यग्रहणातील खग्रास स्थितीपुर्वी दिसणार्या 'बेलीज बीड्?स'चे शास्त्रज्ञ फ्रॅन्सिस बेली यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले.
१९०५ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वेगास शहराची स्थापना करण्यात आली.
१९२८ : मिकी माऊस कार्टून प्लेन क्रेजी या शो मधून पहिल्यांदा प्रसारित केले गेले.
१९३५ : मॉस्को शहरात भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९४० : सॅन बर्नाडिनो, कॅलिफोर्निया येथे 'मॅक्डोनाल्डस'चे पहिले उपहारगृह सुरू झाले.
१९४० : दुसरे महायुद्ध  हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५८ : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ३ चे प्रक्षेपण केले.
१९६० : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ४ चे प्रक्षेपण केले.
१९६१ : पुण्याच्या चतु:शृंगी वीजकेंद्रात प्रचंड स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू
१९८० : संपूर्ण भारतीय बनावटीच्या गोदावरी या पाणबुडीचे माझगाव गोदीमध्ये जलावतरण.
१९९३ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांनी १५ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय परिवार दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.
२००० : दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील मंडीपुरा येथे अतिरेक्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात जम्मू काश्मीरचे ऊर्जा राज्यमंत्री गुलाम हसन बट यांच्यासह ५ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : देवेंद्रनाथ टागोर, बंगाली समाजसुधारक.
१८५९ : पिएर क्युरी, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ.
१८९२ : भारतीय वकील व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभा मतदार संघाचे सदस्य आणि मध्य प्रदेशचे माजी राज्यपाल हरि विनायक पाटसकर यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. श्री. जोग  साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७७)
१९०७ : 'सुखदेव' थापर  क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१४ : तेनसिंग नोर्गे, एव्हरेस्ट वर प्रथम चढाई करणार्या एडमंड हिलरी यांचे सहकारी.
१९२६ : माजी भारतीय नौदल अधिकारी महेंद्रनाथ मुल्ला यांचा जन्मदिन.
१९६७ : माधुरी दिक्षीत-नेने  अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत जनाबाई.
१७२९ : वैशाख व. १४, शके १६५१ मराठेशाहीच्या आपत्?प्रसंगी पराक्रम गाजवणारे खंडेराव दाभाडे यांचे निधन.
१९५८ : मुगल राजघराण्यातील प्रमुख भारतीय इतिहासकार यदुनाथ सरकार यांचे निधन.
१९९३ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा  स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (जन्म: २८ जानेवारी १८९९)
१९९४ : पी. सरदार, चित्रकार व दिनदर्शिका चित्र निर्माता.
१९९४ : ओम अग्रवाल  जागतिक हौशी स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेतील एकमेव भारतीय विजेता
२००० : सज्जन  जुन्या जमान्यातील चित्रपट व नाट्य अभिनेते. तलाक (१९५८), बीस साल बाद (१९६२)
२००३ : अमेरिकेतील प्रसिद्ध गायिका जून कार्टर यांचे निधन
२००७ : लिबर्टी विद्यापीठाचे स्थापक जेरी फेलवेल यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९३३)
२०१० : भारताचे ११ वे उपराष्ट्रपती व राजस्थान राज्याचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत यांचे निधन.

# कडक उन्हात पपई बागेत करावयाचे उपाय



पपई पिकाला सरासरी २२ ते २६ अंश सेल्सिअस तापमान मानवत. पण सध्या तापमानाचा पारा ४० च्या वर गेलाय त्यामुळे पपई ची पानं करपण, फळावर चट्टे पडण, फळातील गर खराब होऊन फळे पिवळी पडून गळतात.

पपई झाडाची मुळे मांसल असल्यामुळे जमिनीतील तापमानामुळे उष्णतेचा परिणाम मुळांवर होतो. त्यामुळे मुळे खराब होतात. मुळांच अन्नद्रव्य आणि पाणी शोषण करण्याचे कार्य मंदावत.फळांचा आकार लहान राहतो आणि फळाच्या गरामध्ये साका तयार होतो. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होते. वाढलेल्या तापमानामुळे पपई झाडावर पांढरी माशी, तुडतुडे या रसशोषक किडी आणि काही विषाणूजन्य रोगही पडतात. त्यामुळे पानांचा रंग हिरवट पिवळसर होतो. पानांवर सुरकुत्या पडतात. जास्त प्रादुर्भावामध्ये फळावर पिवळे चट्टे पडतात. त्यामुळे फळांची प्रत खालावते.

समस्यांवर उपाय काय करायचे :बागेला ठिबक सिंचनाद्वारे शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. झाडाच्या खोडाच्या चारही बाजूंनी उसाचे पाचट, वाळलेले गवत, गव्हाचा भुस्सा, पालापाचोळा, लाकडी भुस्सा यांच आच्छादन कराव.आच्छादनाचा थर साधारण ३ ते ४ इंच इतका खोडाच्या चारही बाजूंनी करावा. बागेत ६० ते १०० मायक्रॉन जाडीच काळया रंगाच प्लॅस्टिक आच्छादन कराव. झाडावर ५ ते ८ टक्के तीव्रतेच्या बाष्परोधकाची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. बागेभोवती वारा प्रतिबंधक कुंपण केल्यासही बागेच उन्हापासून संरक्षण होतं. नवीन लागवड केलेल्या झाडांना गोणपाट किंवा जुन्या साड्या लावून सावली करावी.सायंकाळच्या वेळी संपूर्ण झाडावर एक दिवसाआड पाण्याचा फवारा पंपाने करावे. पिकाची पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी पानांवर १ ते १.५ टक्के पोटॅशिअम नायट्रेट द्रावणाची फवारणी करावी. अशा प्रकारचे साधे उपाय करुन पपई बाग कडक उन्हापासून वाचवता येते.

# चंदनाच्या लागवडीतून करोडोंची कमाई, जाणून घ्या संपुर्ण माहिती

जगभरात भारतीय चंदनाला मोठी मागणी आहे, जी पूर्ण करणे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक आहे. चंदनाच्या वाढत्या मागणीमुळे त्याच्या लाकडाची किंमत मोठ्या प्रमाणात वाढते. यामुळेच भारत सरकार आता शेतकऱ्यांना चंदन लागवडीसाठी प्रोत्साहन देत आहे. वेद आणि पुराणातही चंदनाचे चमत्कार सांगितले आहेत. सौंदर्य वाढवण्यासोबतच आयुर्वेदिक औषधातही याचा वापर केला जातो.

जरी चंदनाची लागवड फक्त दक्षिणेकडील भागात केली जात असली तरी आज बर्फाळ प्रदेश वगळता भारतातील जवळपास सर्व राज्यांमध्ये त्याची लागवड केली जात आहे. बाजारात चंदनाची किंमत जितकी जास्त तितकी ती वाढवण्यासाठी जास्त मेहनत घ्यावी लागते. भारतात, चंदनाची लागवड दोन प्रकारे केली जाते, ज्यामध्ये सेंद्रिय पद्धत आणि पारंपारिक पद्धत समाविष्ट आहे. सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले चंदन १०-१५ वर्षात लाकडात बदलते. परंतु पारंपारिकपणे चंदनाची लागवड करून २०-२५ वर्षांनीच नफा मिळवता येतो. यामुळेच चंदनाची लागवड शेतकऱ्यांसाठी संयमाची बाब ठरत आहे. एका चंदनाच्या झाडापासून सुमारे १५-२० किलो लाकूड मिळते, जे बाजारात २ लाख रुपयांपर्यंत विकले जाते. बाजारात चंदन ३ ते ७ हजार रुपये किलो दराने विकले जात असले तरी मागणी वाढल्याने ते १० हजार रुपयांपर्यंतही विकले जाते.जर आपण त्याची रोपवाटिका उभारण्याबद्दल बोललो तर एक रोप १००-१५० रुपये किमतीत उपलब्ध आहे. शेतकऱ्यांची इच्छा असल्यास ते एक हेक्टर जमिनीवर ६०० रोपे लावू शकतात. हीच झाडे बनू शकतात आणि पुढील १२ वर्षांत ३० कोटी रुपयांपर्यंत निव्वळ नफा देऊ शकतात. एकट्या चंदनाच्या झाडातून सुमारे ६ लाख रुपये कमावले जातात. काही वर्षांपूर्वीपर्यंत चंदनाच्या लागवडीवर बंदी होती, म्हणजेच शेतकरी सरकारची परवानगी घेऊनच चंदनाची लागवड करत असत. मात्र आता त्याच्या परवानगीने त्याच्या लागवडीसाठी सरकार २८-३० हजार रुपयांपर्यंत अनुदान देत आहे. एवढेच नाही तर सरकारने चंदन खरेदीवरही बंदी घातली आहे. म्हणजे शेतकऱ्यांकडून फक्त सरकारच चंदन खरेदी करू शकते.

**एकट्या चंदनाचे झाड कधीही लावू नका**

एकट्या चंदनाचे झाड कधीही लावू नका, कारण ही एक परजीवी प्रजाती आहे जी इतर झाडांपासून पोषण मिळवते. चंदनाची झाडे दमट भागात लावू नयेत, कारण त्याच्या लागवडीला जास्त पाणी लागत नाही. चंदन ही झपाट्याने वाढणारी वनस्पती आहे, त्यामुळे इतर प्रकारची झाडे फक्त ४-५ फूट अंतरावर लावा.

अधिक पाणी दिल्यास ते कूजते

चंदनाच्या झाडाला जास्त पाणी दिल्याने ते कुजते, त्यामुळे त्याला पाणी साचू देऊ नका. त्याच्या लागवडीसाठी, किमान २ ते २.५ वर्षे जुने रोप लावा. चंदनाच्या झाडांभोवती स्वच्छता राखा कारण प्रदूषणामुळे त्यांची वाढ थांबते.



# जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा : 'लसूण घास'

द्विदलवर्गीय, जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा पीक म्हणजे 'लसूण घास'. या चाऱ्याला इंग्रजीत 'ल्युसर्न' किंवा 'अल्फाल्फा' या नावाने सुद्धा ओळखतात.

लसूण घास चाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने, काष्ठमय तंतू, कर्बोदके आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळतात. या चाऱ्यामध्ये १८ ते २० टक्के प्रथिने, २.० टक्के स्निग्धांश, २५ टक्के तंतू, २९ टक्के कर्बोदके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, उपयुक्त आम्ले तसेच अ आणि ड जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या चारा पिकाला विशेष महत्व आहे. हे पीक तीन वर्षापर्यंत शेतात टिकते. दरवर्षी १२ ते १५ कापण्या मिळतात ज्यातून सरासरी १०० ते १२५ टन हेक्टरी हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते. या चारा पिकाच्या लागवडीतील महत्वाचे मुद्दे जाणून घेऊ या. या चारा पिकाला मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी, तसेच सामू ७.५ ते ८ दरम्यान असणारी जमीन चांगली मानवते. ऑक्टोबर- नोव्हेंबर हा कालावधी लागवडीसाठी योग्य समजला जातो. हे पीक जमिनीत तीन वर्षांपर्यंत टिकणारे असल्यामुळे जमिनीची चांगली मशागत करावी लागते. या पिकास भरपूर प्रमाणात भरखते व वरखते देणे गरजेचे आहे. मशागतीच्या वेळी हेक्टरी १५ ते २० टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीपूर्वी २० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व ५० किलो पालाश या रासायनिक खतांची प्रति हेक्टरी मात्रा द्यावी. त्यानंतर दर तीन ते चार कापण्यांनंतर हेक्टरी ५० किलो स्फुरद खताची मात्रा द्यावी. लागवडीसाठी आरएल-८८, आनंद-२, आनंद-३, को-१ सुधारित जातींची निवड करावी. ओळीत पेरणी केल्याने खते देणे सोपे जाते. हात कोळप्याने आंतरमशागत करता येते. ओळीत बियाणे पेरणी करण्या अगोदर जमिनीमध्ये वाफे तयार करून घ्यावेत, जमिनीच्या उतारानुसार साधारणपणे ३ ते ५ मीटर रुंद व १० मीटर लांबीचे वाफे तयार करावेत. त्यानंतर एक फूट अंतरावर काकऱ्या पाडाव्यात. दोन ओळींत एक फूट अंतर ठेवून ओळीत बियाणे पेरणी केली असता हेक्टरी २५ किलो एवढेच बी पुरेसे होते. ओळीतील पेरणीमुळे हातकोळपणी यंत्राने कमी खर्चात तणनियंत्रण करता येते. पेरणीपूर्वी १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियमची बीजप्रक्रिया करावी. बी पेरल्यानंतर पहिले पाणी हळुवार द्यावे. जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. तुषार सिंचनाने पाणी देणे फायद्याचे ठरते.

लसूण घासाची पहिली कापणी पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी करावी. पहिल्या कापणीनंतर दर २२ ते २५ दिवसांनी कापणी करावी. कापणी जमिनीपासून ५ ते ६ सें.मी. उंचीवर करावी. कापणी करताना पीक उपटून येणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटच्या कापणीनंतर पिकाला ५ ते ६ दिवस पाण्याचा ताण देऊन खुरपणी करावी. पाणी देण्यापूर्वी हेक्टरी १०० किलो स्फुरदची मात्रा द्यावी. पाणी देऊन पीक बियाण्यासाठी सोडावे. लसूण घासाचे पीक ५० टक्के फुलोऱ्यात आल्यानंतर २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची दुसरी फवारणी करावी. यामुळे बियाणे उत्पादनात २० टक्के वाढ होते.



# कृषी विभागामार्फत मिळणाऱ्या योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा-आ. नारायण कुचे

अंबड । प्रतिनिधी

कृषी विभाग अंतर्गत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे असे आवाहन आमदार नारायण कुचे यांनी शेतकऱ्यांना केले आहे . १२ मे सोमवार रोजी अंबड पंचायत समिती कार्यालय येथे खरीप हंगामपूर्व आढावा बैठक दरम्यान श्री आमदार कुचे बोलताना म्हणाली यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी श्री रोडगे यांनी प्रास्ताविक करून खरीप हंगाम २०२४-२५ बाबत केलेले नियोजन बाबत माहिती दिली . तालुका कृषि अधिकारी, अंबड श्री बाळासाहेब गंडे यांनी मागील वर्षभरात कृषी विभाग मार्फत राबवलेल्या योजनाची माहिती दिली तसेच येणाऱ्या खरीप हंगामासाठी कृषि विभागाने केलेल्या नियोजनाचे सादरीकरण केले. खते बियाणे नियोजन बाबत माहिती दिली तसेच कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या प्रचलित योजनांची आणि मोहिमांची माहिती दिली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.श्री.नारायण कुचे यांनी शेतकऱ्यांना येत्या खरीप हंगामात वेळेवर बियाणे आणि खते




उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्यांनी जास्त दराने खते आणि बियाणे विक्री करणाऱ्या कृषि सेवा केंद्रांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच त्यांनी खतांसोबत लिंकिंग करणाऱ्या , जास्त भावाने विक्री करणारे , विनापरवना बियाणे खते विक्री करणाऱ्या कंपन्या, विक्रेते यांच्या वर कडक कारवाही करण्याची व वेळप्रसंगी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच त्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अंतर्गत ग्रामस्तरीय सूक्ष्म नियोजन करताना गावातील नागरिकांना विश्वासात घेऊनच मृद व जलसंधारण कामांचे नियोजन करण्यासंदर्भात सूचना दिल्या. तसेच कृषि विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी गावपातळीवर मोहीम स्वरूपात सर्व योजना राबवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषि विभागाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत सूचना दिल्या. तसेच आमदार नारायण कुचे यांनी शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज वाटप करण्याचे आदेश बँकांना देण्यात आले,तसेच शेतकऱ्याचे कर्ज खाते होल्ड न करण्याचे आदेश देण्यात आले.तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप, कुसुम योजनेतील कृषी पंप वेळेत बसवण्याचे आदेश महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. तसेच यावेळी आ. नारायण कुचे यांच्या मार्फत शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत कृषी यांत्रिकीकरण योजनेतील ट्रॅक्टर व पावर टिलर अवजाराचे वाटप करण्यात आले, तसेच तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्याचे आ.नारायण कुचे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.या आढावा बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, तहसीलदार विजय चव्हाण, गट विकास अधिकारी उदयसिंग राजपूत, बाजार समितीचे अवधूत नाना खडके, बाजार समितीचे सदस्य श्रीराम नागरे, राम जाधव मा. जि. प. सदस्य डॉ.नंदकिशोर पिंगळे, सामाजिक कार्यकर्ते देवा चित्राल, सौरभ कुलकर्णी, दत्ता जाधव, डॉ. राहुल डोंगरे, संजय जाधव कृषी विभाग, महसूल विभाग पंचायत समिती अंबड महावितरण सामाजिक वनीकरण जलसंधारण व मृगसंधारण व तालुक्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँक, विमा कंपनीत प्रतिनिधी यांचे अधिकारी व कर्मचारी सह अंबड तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोद्यात बुद्ध जयंती निमित्त शांतता, समता आणि करुणेचा जागर



पाटोदा। प्रतिनिधी

जगाला जर शांतता हवी असेल तर बुद्धाचे तत्व स्वीकारावे लागतील... युद्धाने कटूता वाढते तर बुद्धाने प्रेम वाढते, या विचारांचा जागर करत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पाटोदा शहरात अत्यंत शांततेत,भक्तिभावाने आणि सामाजिक सलोख्याने साजरी करण्यात आली.या निमित्ताने भीमनगर येथील बुद्ध विहारात सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. पंचशील ध्वज हा समतेचा, शांततेचा आणि करुणेचा प्रतीक असून, याच्या माध्यमातून तथागतांच्या शिकवणीचा प्रसार करण्यात आला.

ध्वजारोहणानंतर विहारात भगवान बुद्धांच्या प्रतिमेची विधीवत पूजा पार पडली.यानंतर बुद्ध मूर्तीची भव्य शांततेत मिरवणूक पाटोदा शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत विविध वयोगटातील बौद्ध अनुयायी, महिला, तरुण, बालगोपाळ यांनी सहभाग घेतला. डोक्यावर पंचशील ध्वज, हातात घोषवाक्यांचे फलक आणि डॉल-ताशांच्या गजरात मिरवणूक शहरातून मार्गस्थ झाली. ''जय भीम'' च्या घोषणांनी शहराचे वातावरण भारावून गेले होते.

शहरातील नागरिकांनी मिरवणुकीचे विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत केले. या शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या मिरवणुकीमुळे बौद्ध अनुयायांचे संघटन, संस्कृतीप्रेम आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली. मिरवणुकीनंतर बुद्ध विहारात सामूहिक पूजापाठ पार पडला. विशेष पूजेनंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी संयोजन केले.बुद्ध पौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो समतेचा, करुणेचा आणि शांततेचा जागर करणारा दिवस आहे. या निमित्ताने पाटोदा शहराने तथागतांच्या विचारांचा प्रसार करत अनुकरणीय आदर्श घालून दिला.

## वनविभागाला गायरान जमिन देण्यास महाजनवाडीकरांचा विरोध



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील महाजनवाडी ग्रामपंचायत अंतर्गत २५ वर्षांपासून झाडे लाऊन जोपासलेली व संपूर्ण गावाची पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण क्षेत्र बाधित होणार असल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी काळु नदीवरील नियोजित प्रकल्पांमधील वन जमिनीच्या बदल्यात बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील ४० हेक्टर जमिन वनविभागाच्या ताब्यात देण्याचे आदेश काढले असुन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तशा हालचाली सुरू केल्या असुन महाजनवाडी ग्रामस्थांनी एकमुखाने ठराव घेऊन विरोध दर्शविला असुन तसे जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिले असुन गावकरी आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी,माजी सरपंच दत्ता घरत, तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे व ग्रामस्थांनी सांगितले आहे.

महसूल व वनविभाग शासन परिपत्रक दि.२८.०५.२०१० अन्वये ज्या प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केलेले आहेत.त्या प्रयोजनासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यापुर्वी ग्रामसभेचा संमतीदर्शक ठराव असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी असे नमूद केले आहे. ग्रामपंचायतने तसा कोणताही संमतीदर्शक ठराव दिलेला नाही. गावाने २५ वर्षांपासून कोणतेही अतिक्रमण न होऊ देता झाडांची लागवड करून जोपासल्याने सामाजिक वनीकरण विभागाकडून २ वेळेस राज्यस्तरीय पुरस्कार गावाला मिळाले आहेत. गेल्यावर्षी सामाजिक वनीकरण विभागामार्फत ३० हजार झाडांची लागवड केली असुन पुढच्या वर्षी ते ग्रामपंचायतीच्या ताब्यात मिळणार आहे. ग्रामस्थांनी बैठकीत एकमुखाने वनविभागाच्या ताब्यात जमीन देण्यास विरोध केला असुन दि.२३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांना ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने लेखी निवेदन दिले असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.

गावची लोकसंख्या २५०० च्या आसपास असुन गाव आणि वस्त्यांना पाणी पोहोच करणाऱ्या ग्रामीण पाणीपुरवठा करणाऱ्या २ विहिरी,जलयोजना याच गायरान जमिनीवर आहेत. तसेच ४ बोअरवेल तसेच गावाच्या पाणीपुरवठा विहिरीच्या वरच्या बाजूला पाझर तलाव घेतलेला आहे.तसेच आजुबाजुच्या कोंबडवस्ती,तुकाई वस्ती यांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आले असुन वनविभागाच्या ताब्यात जमीन दिल्यास भविष्यात वनविभागाचे नियम पाहता ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागणार असल्याने ग्रामस्थांचा याला विरोध असल्याचे माजी सरपंच दत्ता घरत यांनी सांगितले.मांजरसुंभा ते पाटोदा रस्त्यावरून महाजनवाडी बोरखेड कडे जाणारा मुख्य रस्ता वनविभागाच्या ताब्यात गेल्यास भविष्यात रस्ता दुरुस्ती व ईतर कामांची अडचण होईल.कारण आमच्या गावाशेजारील फुकेवाडी येथील गेल्या कित्येक वर्षानंतर मंजुर झालेला डांबरीकरण रस्ता वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी अठवल्याने ठेकेदार यांनी अर्धवट रस्ता करून काम सोडून दिले. फुकेवाडी ग्रामस्थांनी वारंवार निवेदने ,आंदोलने करूनही काही उपयोग झाला नाही.भविष्यात तीच वेळ आमच्यावर येऊ शकते त्यामुळे ग्रामस्थांचा विरोध असल्याचे तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे यांनी सांगितले.

## तीन जिवलग मित्रांना एकाच वेळी लागली नोकरी

वडवणी। प्रतिनिधी

ते तिघे एकाच गावचे असल्यामुळे बालपणापासून सोबत खेळले, बागडले. घरची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे लहानपणी स्वप्न रंगू लागले. गावातील वीज मंडळाचे कार्यालय पाहिलं की आपणही एक दिवस या साहेबांसारखं नोकरी करावी अशा भावना ते व्यक्त करत. आणि मोठ्याने हसत आणि तो दिवस आला ज्या दिवशी हे तिघेही बालमित्र महापारेषण मध्ये नोकरीला लागले. चिंचवन येथील या मित्रांची कथा ऐकली, पाहिल्यानंतर गावकऱ्यांचे उर देखील भरून आलं. आणि चिंचवन गावकऱ्यांनी मुधुमधडाक्यात या आपल्या गावच्या सुपुत्रांचा भव्य दिव्य सत्कार गावात केला. या कार्यक्रमाचे आयोजक युवा नेते ईश्वर तांबडे डॉ.अंगद तांबडे पत्रकार हनुमंत मात्रे यांनी केले. चौकट सेवानिवृत्त शिक्षक शेख महबूब शेख अब्बास यांचे देखील गावकऱ्यांच्या मार्फत भव्य सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या त्यांनी देखील गावकऱ्यांना त्याप्रसंगी मार्गदर्शन केलं.

तालुक्यातील चिंचवन येथील रहिवासी असलेले चिरंजीव ओमकार मात्रे,



आदिनाथ मात्रे व पवन कोठुळे हनुमंत आंधळे या चार जणांचा गावकऱ्यांच्या मार्फत भव्य सत्कार करण्यात आला. हे तिन्ही बालमित्र यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. पवनचे आई वडील दरवर्षी परभागामध्ये ऊस तोडणीचे काम करतात त्यामुळे त्याचं शिक्षण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये झालं. ओमकार यांचे आई वडील हे देखील ऊसतोड कामगार आहेत. त्याच्याही वडिलांना केवळ दोन एकर जमीन आहे. त्यामुळे त्याच्या घरची परिस्थिती बेताचीच आहे. तर आदिनाथ याच्या घरची परिस्थिती देखील सर्वसामान्यच आहे. त्यांचेआई वडील देखील शेतामध्ये काम करूनच उदरनिर्वाह करतात या तिन्ही मुलांनी बालपणीपासून सोबतच गावातील मंकावती शाळेमध्ये घेतलं शिकत असताना गावातील वीज मंडळाचे कार्यालय त्यांना नेहमी दिसत असे. या कार्यालयामध्ये येणारे जाणारे कर्मचारी पाहून त्यांना असं वाटायचं की आपणही एक दिवस या साहेबांसारखे नोकरीला लागू. हे स्वप्न रंगवत त्यांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षण घेऊन त्यांनी महापारेषण परीक्षा दिली. एकाच वेळी परीक्षेमध्ये पास झाले. या तिघांनाही एकाच दिवशी नियुक्ती मिळाली त्यामुळे या तिन्ही मित्रांचे स्वप्न साकार झालं. गावामध्ये त्यांच्या निवडीची माहिती मिळताच गावकऱ्यांनी फटाक्याच्या अतिश बाजी करून या तिन्ही तरुणांचं स्वागत केलं. गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येत हनुमान मंदिराच्या भव्यदिव्य प्रांगणात या तिघांचाही नागरी सत्कार केला. गावातील सर्व नागरिक यावेळी उपस्थित होते. प्राचार्य सोमनाथराव बडे, युवा नेते ईश्वर तांबडे, डॉ. अंगद तांबडे, शेख मेहबूब सर, हनुमंत मात्रे, प्रताप मात्रे, अंगद मात्रे, अरुण कोठुळे, विष्णू कोठुळे, नवनाथ तांबडे, शिवाजी मुंडे, डॉक्टर दुटळ साहेब, बालासाहेब बडे, सुरेश दोडताले, शिवाजी दोडताले ,बालू तुरे लक्ष्मण मात्रे ,गोवर्धन कुटुळे, शहादेव मात्रे ,अंगद बडे, अशोक मात्रे, वाघा मात्रे, कृष्णा नखाते ,सुखदेव कुटुळे, विष्णू कुटुळे ,पांडुरंग मात्रे ,विक्रम कुटुळे, शिवाजी कोठुळे, शेख साहिल, अरुण कुटुळे ,लिंबा मात्रे, देवानंद तांबडे ,अखिल कोठुळे, संदीप नानवर, पुरुषोत्तम आबा तांबडे, अमोल पोळ , इंदू बडे ,नाजम शेख ,तात्या कुटुळे, सुग्रीव मात्रे, बाबुराव तावरे ,सखाराम बडे असे अनेक मान्यवर स्वागत कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## शिवार साहित्य संमेलनातील कथाकथनाला रसिकांची दाद

माजलगाव। प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने रविवार दि.११ मे आयोजित १६ व्या शिवाय साहित्य संमेलनातील कथाकथनाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.या कथाकथन सत्राच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध कथाकार गेणू शिंदे होते. यामध्ये परभणी येथील प्रसिद्ध कथाकार अर्चना डावरे सहभागी झाल्या होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अर्चना डावरे यांनी ''शब्दालय'' ही कथा सादर केली.यामध्ये त्यांनी सैनिकाचे वीरमरण व देशभक्ती विषद केली.कथाकथन सत्राचे अध्यक्ष गेणू शिंदे यांनी ''पुनर्जन्म'' ही कथा सादर केली.यामध्ये त्यांनी शेतीचे महत्व विशद केले.दोन एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाने एक एकर शेती विकून गाडी घेतली.त्यामध्ये त्याचा अपघात झाला.दवाखान्यात भरपूर पैसे गेले. यामुळे राहिलेले एक एकर शेत विकावं लागलं. त्यानंतर मात्र तो दुरुस्त झाला. आणि मी पुन्हा शेतीच करणार असा निर्धार त्याने केला.या दोन्ही कथांना रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. या कथाकथन सत्राचे सूत्रसंचालन नारायण झोडगे यांनी केले तर आभार विशाल वायाळ यांनी मानले.यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा.पडलवार, स्वागताध्यक्ष भारत होके,मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,प्रा.स्नेहल पाठक,प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड, किशोर गुंजकर, बालासाहेब झोडगे, प्रा.डॉ.उमेश साडेगावकर, बबनराव सोळंके, सदाशिव थिगळे, रामकिसन सोळंके, विठ्ठलराव सोळंके, राजाभाऊ होके, रामदीप डाके, प्रकाश वाकणकर, अभय होके पाटील, नारायण होके,प्रा. रावसाहेब देशमुख, नागनाथ बडे, विठ्ठल चव्हाण, आत्माराम कुटे, पोशेट्टी लखमावाड, गौरी देशमुख, प्रा.संगीता जाधव, दीपक पांढरे,शरद रांजवण, बालाप्रसाद चव्हाण,मोहन राठोड,डॉ.प्रज्ञा जोशी,औदुंबर कातारे,ॲड.दत्ता जाधव,प्रकाश पत्की,अनंत शेजुळ, पद्माकर शिंदे,भारत राहुल,शिवाजीराव शेजुळ यांच्यासह साहित्य प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जैन इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के

अंबड। प्रतिनिधी

अंबड येथील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कूलचा निकाल १००% घोषित झाला असून शैक्षणिक वर्ष २४-२५ मध्ये शाळेत एकूण ८२ विद्यार्थ्यांपैकी ६५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून १३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. तर ०४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. या परीक्षेत प्रथम गौरी वावरे ९८.८०%, द्वितीय जयकिर्ती अग्रवाल ९७.००%, तृतीय क्रमांक शेळके हर्षदा ९६.८०% व वैराळ तेजस्विनी ९६.८०% गुण मिळवले असून या निकालात गणित विषयात १०० पैकी १०० गुण घेणारे आठ विद्यार्थी असून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रवीणकुमार कासलीवाल, डॉ. रमेशचंद्र गंगवाल, शिरीष सावजी, प्रवीण बाकलीवाल, संजय चांदीवाल, सुरेश दिडपोळे, डॉ. राजेंद्र काला, डॉ. नरेश अग्रवाल, डॉ.संतोष मोहळे, चंद्रप्रभू दिडपोळे, संजय इंचूरे, मुकेश सावजी, संतोष बाकलीवाल, दिपक पाटणी, भूषण काला, डॉ. अनिल पांडे, दिलीप बुर्ले तसेच शाळेचे मुख्याध्यापक एन. एस. भारद्वाज व शिक्षकवृंद, पालक आदींनी अभिनंदन केले.

## लेकीमुळे मिळते हो,खरे ईश्वरी ते सुख
### शिवार साहित्य संमेलनात रंगले कविसंमेलन

माजलगाव। प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने रविवार दि.११ मे आयोजित १६ व्या शिवार साहित्य संमेलनात कविसंमेलन चांगलेच रंगले.या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कवयित्री प्रतिभा थिगळे होत्या. कवी मोहन राठोड यांनी ''लेकीमुळे मिळते हो, खरे ईश्वरी ते सुख घरी वावरते जेंव्हा'',माझी लाडकी ती लेक ही कविता सादर केली.बालाप्रसाद चव्हाण यांनी ''मी हसलो कि ती हसायची,मी बसलो की ती ही बसायची ही कविता सादर केली.प्रा.संगीता जाधव यांनी ''कधी बरसतोस बेफाम होऊन,तेव्हा जातोस सर्वस्व कवेत घेऊन ही कविता सादर केली.डॉ.प्रज्ञा जोशी यांनी ''संपत्तीचा खेळ सारा पैसेवाला नेता इथला'' ही कविता सादर केली. विठ्ठल चव्हाण यांनी ''नाम्याची माय मेली,तरी नाम्या रडला नाही, नाम्याचा बाप मेला तरी नाम्या रडला नाही''ही कविता सादर केली.

आत्माराम कुटे यांनी''बर्फाच्या त्या मेरू वरती,रक्त सांडले वीरांचे'' ही कविता सादर केली. नागनाथ बडे यांनी ''झटका आला




प्राण गेला,चिमीची झाली दैना,आई बापाचं पोट जळालं,परत काही येईना''ही कविता सादर केली. अश्विनी वाकणकर यांनी ''माझे शरीर तुझे चरण,विरले स्वत्व झाले समर्पण,आता आले शरण पांडुरंग'' हा अभंग सादर केला.

डॉ.मानसी देशमुख यांनी''कडी गेली कोंडा गेला,आता आलं लॉक,मॅसेज मॅसेज मध्येच गैरसमज,त्यात जवळचे झाले ब्लॉक''ही नेक्स्ट जनरेशन कविता सादर केली.कैलास सोळंके यांनी''बाप असतो आधारवड, कधी कधी तो कळतो''ही कविता सादर केली.या शिवाय ना.मा. पडलवार,गौरी सुहास देशमुख,डॉ. मीनाक्षी निळेकर, दुर्गा राऊत,स्मिता लिमगावकर, प्रकाश पत्की, भगवान धरपडे, शरद रांजवण, औदुंबर कातारे, अरुण देशमुख, ॲड.दत्ता जाधव, प्रवीण काळे, विशाल वायाळ, शिवराम होके, खेलबा काळे,डॉ. विठ्ठल वाघ,डॉ. वैभव भगत,दीपक पांढरे,पोशेट्टी लखमावाड,डॉ. रमेश घुमरे,अनिल कुलकर्णी यांच्या कवितांना रसिकांनी भरभरून दाद दिली.या कवीसंमेलनाच्या अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ कवयित्री प्रतिभा थिगळे यांनी संपूर्ण कविसंमेलनाचा आढावा घेतला व आपले उत्स्फूर्त मनोगत व्यक्त केले. या कविसंमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन गोविंद गोचडे,गीता सोळंके - होके यांनी केले तर आभार मोहन राठोड यांनी मांनले. या कविसंमेलनाला स्वागताध्यक्ष भारत होके,मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,प्रा.स्नेहल पाठक प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड, किशोर गुंजकर, प्रकाश वाकणकर, वर्षा कुरे, काकासाहेब थावरे, अभय होके पाटील,नारायण होके,दीपक राऊळ,प्रकाश राऊळ,रामकिसन सोळंके,विठ्ठलराव सोळंके,भारत राऊळ,प्रा.सत्यप्रेम लगड,डॉ.रमेश गटकळ,सदाशिव थिगळे,सुचिता होके,आप्पासाहेब होके,बंडू शेजुळ यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## युसूफवडगांव येथे बुद्ध पोर्णिमा उत्साहात साजरी



युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे काल बुद्ध पोर्णिमाच्या अर्थात बुद्ध जयंती निमित्ताने तथागत गौतम बुद्ध यांना अभिवादन करून करून त्यांची जयंती उत्सहात साजरी करण्यात आली.

अखंड विश्वाला शांती अहिंसाचा मार्ग शिकवणारे तथागत महाकारुणीक भगवान गौतम बुद्ध यांची जयंती दरवर्षी वैशाखी पोर्णिमेला म्हणजेच बुद्ध पोर्णिमेला जगभर साजरी करण्यात येते.युसूफवडगांव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बुद्ध पोर्णिमेच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यासाठी भिमनगरमधील बौद्ध विहारामध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सौ. सुनिता निशिगंध, सौ.रूक्मीणबाई सातपुते,सौ.मंदाकिनी उजगरे,सौ.आश्विनी निशिगंध,सौ.पुनम सातपुते,सौ.रजनी निशिगंध,सौ.शितल निशिगंध,सौ.चांदणी निशिगंध,सौ.स्वाती सातपुते,सौ.पुजा उजगरे यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले.

यावेळी सामुहीक त्रिसरण,पंचशील व बुद्ध वंदना घेऊन वंदन करण्यात आले.तसेच यावेळी उपस्थित समाज बांधवांना खिर दान करण्यात आले.यावेळी किरण सातपुते,संजय लांडगे,आनिल उजगरे,अनंत सातपुते,राहुल उजगरे,महादेव बचुटे,दयानंद सातपुते, जयराज निशिगंध,सुमेध उजगरे,श्रावण लांडगे,पत्रकार सचिन उजगरे तसेच मोठ्या संख्येने बौद्ध उपासक व बौध्द उपासिका उपस्थित होत्या.

# गाळ माफियांचा नंगानाच; विना नंबरच्या टिप्परने शेतकऱ्यास उडवण्याचा प्रयत्न

## जिल्हाधिकारी साहेब गाळ माफियाला कधी आवर घालणार, महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या टिप्परवर काय कारवाई करणार, एसडीएम व तहसीलदार यांच्या आशिर्वादाने खुलेआम गाळ उपसा सुरू

**धारुर | प्रतिनिधी**

**धारुर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलिका धरणातुन अवैध गाळ उपसा चालु गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असुन हा गाळ उपसा माजलगावचे उपविभागीय अधिकारी व धारुरचे तहसीलदार यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याने महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी मुग गिळुन गप्प बसत आहेत.**

काल दि.१२मे सोमवार रोजी कारी फाटा येथे पाऊस चालू असल्याने कारी येथील शेतकरी नितिन मोरे हे रस्त्याच्या कडेने चालत असताना गाळ माफियांच्या विना नंबरच्या टिप्परने या शेतकऱ्यांस उडवण्याचा प्रयत्न केला हा गाळ माफियांचा नंगानाच सुरू असुन संतप्त ग्रामस्थांनी टिप्पर अडवून पोलीस अधीक्षकांना फोन करून माहिती दिली.तरी आता महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या टिप्पर वर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी विना नंबरचे टिप्पर संतप्त ग्रामस्थांनी अडवून ठेवले परंतु








महसूल प्रशासनाचा व पोलीस प्रशासनाचा एकही कर्मचारी देखील याकडे फिरकला नाही. यावरूनच दिसून येते की महसूल प्रशासनाचे व पोलीस प्रशासनाचे कर्मचारी व अवैध गाळ उपसा करणारे गाळ माफियांचे किती लागेबांधे आहेत यावरून दिसून येते. माजलगाव उपविभागीय अधिकारी व धारूर तहसीलदारांच्या आशिर्वादाने सर्रास कुंडलिका धरणातुन गाळ उपसा करत वीटभट्टी चालकांना विक्री केला जात आहे.यावर अनेक शेतकऱ्यांनी आवाज उठवून ही धारूर तहसीलदार काहीच कारवाई करत नसल्याने धारूर तहसील प्रशासनाच्या विरोधात ही शेतकऱ्यांत तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनीवरील अवैध गाळ उपसा हा मोठ्या प्रमाणात सुरू असून हा गाळ शेतकऱ्यांना न देता हा गाळ वीटभट्टी धारकांना विकला जात असून गाळ उपशासाठी तालुका प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी व गाळमाफिया यांचे संगणमत असून कोट्यावधी रुपयांच्या गाळासाठी लाखो रुपयांची डिल झाले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. यामुळेच महसूल प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. जिल्हाधिकारी साहेब या गाळ माफियाला कधी आवर घालणार असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत तर महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या विना नंबरच्या टिप्परवर काय कारवाई करणार का काही तरी ओले हात करून असेच सोडुन देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बाळराजे पवार जनसेवेत सक्रिय

### जनतेत दाखल होताच नागरिकाची भेटण्यासाठी गर्दी

गेवराई | प्रतिनिधी

गेवराई मतदार संघामध्ये पंडित विरोधी पवार सत्ता समिकरण वर्षानुवर्षे चाललेले आहे गेल्या दोन दशकांमध्ये पवार कुटुंबाला मोठ्या संघर्षातून जीवन जगावं लागलं तरी सुद्धा त्यांनी जनतेची सेवा सुरूच ठेवली असे स्व माधवराव बप्पासाहेब पवार यांचे कुटुंब पवार कुटुंबाचा करता धरता युवा तरुण बाळराजे माधवराव पवार तरुण वयातच एका गुन्हात जेलमध्ये सजा भोगतो आजोबा आमदार वडील आमदार असताना कुठलाच बडे जाऊपना न करणारे



**पवार कुटुंबाचा प्रमाणिकपणा व निष्ठा बाळराजे पवारांनी जनतेत सिद्ध केला**

प्रमाणिक सच्चे गेवराईचे पाटील म्हणून बाळराजे दादा पवार यांच्याकडे पाहीले जाते बाळराजे दादा पवार यांनी पाहिलेले स्वप्न साखार करण्यासाठी बंधू लक्ष्मण माधवराव पवार यांनी नगरपालिकेच्या मैदानात उतरुन बाजी ◀◀ पान ३ वर

# संत कृपने व सहवासाने मानवाला ब्रम्हज्ञान प्राप्त होते - ह.भ.प. सुरेखाताई मेटे महाराज

आष्टी | प्रतिनिधी

अमूल्य किंमतीचा हा नरदेह कोटी रुपये खर्च करूनसुद्धा पुन्हा प्राप्त होत नाही. जमीन, गेलेले धन हे पुन्हा मिळवता येते पण एकदा शरीर गेलं की पुन्हा शरीर मिळत नाही म्हणून या शरीराकडून भगवंताचे नामस्मरण करुन घेतले पाहिजे.अनंत जन्माच्या पुण्याईने हा देह आपल्याला प्राप्त होतो. काहींना नरदेह मिळाला नाही त्याचे महत्त्वही कळालेले नाही, काहींना नरदेह मिळाला त्याचं महत्त्वही कळालं. काहींना नरदेह मिळाला नाही परंतु त्याचे महत्त्व कळालं आणि आपण संसारी जीव असे आहोत



आपल्याला नरदेह प्राप्त झाला.मिळाला परंतु नरदेहाचं महत्त्व आपल्याला कळलेलं नाही म्हणून नको त्या विषयाकडे जीवाची धाव आहे.साधु संतांच्या सहवासामध्ये गेल्यानंतर या जीवाला मी कोण आहे ? मी कुठून आलोय? मला कोठे जायचे ? याची जाणीव संत करून देत असतात.संत कृपेने व संत सहवासाशिवाय खरे ज्ञान मिळत नाही. संत सहवासाने ब्रम्हज्ञान प्राप्त होते असे प्रतिपादन ह.भ.प.सुरेखाताई मेटे महाराज यांनी केले.


आष्टी येथील मनसे नेते कैलास दरेकर यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पंचदिनी किर्तन सप्ताहात किर्तन प्रसंगी ह.भ.प. सुरेखाताई मेटे महाराज बोलत होत्या. यावेळी रविंद्र तवले,शिवदास केरुळकर,लाला महाराज राक्षे, उत्तम महाराज धोंडे, नानासाहेब तवले, सुरेश डोमकावळे, किसन महाराज जगताप, कैलास ◀◀ पान ३ वर

# दहावीच्या परीक्षेत जुनैरा अंबर व अलिना फातेमाचे यश

बीड | प्रतिनिधी

दहावी च्या बोर्ड परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.१३) रोजी जाहीर झाला. या परीक्षेत बीड येथील जुनैरा अंबर ९० तर अलिना मतीन शेख हिने ८५ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.





विद्यार्थी दशेतील महत्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.१३) रोजी दुपारी १ वाजता जाहीर झाला. जुनैरा अंबर ही महाराष्ट्र राज्य जीवनोत्ती विभागाचे बीड जिल्हा व्यवस्थापक शेख शकील यांची कन्या आहे तर अलिना फतेमा ही त्यांची भाची आहे.

# जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने अपात्र ठरवलेल्या सरपंच/ सदस्य यांना पुन्हा तात्काळ पदभार द्या–प्रा.ईश्वर मुंडे

**बीड | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी निवडणूक दिनांका पासून एका वर्षाच्या आत आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होते.मात्र काही सरपंच व सदस्यांनी विहित कालमर्यादेत प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्ह्यातील अनेक सरपंच व सदस्य यांना अपात्र ठरवले होते.

राष्ट्रावादी काँग्रेस चे नेते



प्रा.ईश्वर मुंडे व सरपंच परिषदेचे दत्ता काकडे यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केल्याने महामहीम राज्यपाल यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार सर्व संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्षाचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

तरी यापूर्वी अपात्र ठरवण्यात आलेले सरपंच,सदस्य व इतर पदाधिकारी यांना पूर्ववत कार्यरत ठेवण्यासाठी नव्याने आदेश काढून अपात्र ठरवलेल्या सर्व सरपंच, सदस्यांना तात्काळ पूर्ववत पदभार द्यावा अन्यथा दि. १९ मे ◀◀ पान ३ वर

# शालांत परीक्षेत गोदावरी कुंकूलोळ यो.कन्या विद्यालयाचे घवघवीत यश

अंबाजोगाई | प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालयाचा एकूण निकाल ९८.५९ टक्के इतका लागला आहे. विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश प्राप्त केले असून ५३ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण घेऊन सन्मानाचे स्थान प्राप्त केले आहे. विद्यालयातील पायल ज्ञानोबा माले हिने ९८. ४० टक्के गुण घेऊन विद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे ईश्वरी अभिजित देशपांडे हिने ९८.०० टक्के गुण घेऊन द्वितीय तर अनुष्का उमेश बारसे व नंदिनी भगवंत पवार या दोन विद्यार्थिनींनी ९७.६० टक्के गुण प्राप्त करून विभागुन तृतीय क्रमांक मिळविला आहे. विद्यालयातील २८४ विद्यार्थिनी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाल्या त्यातील २८० विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत

विशेष प्राविण्यासह १७२,प्रथमश्रेणी ६६, द्वितीय श्रेणी २६ ◀◀ पान ३ वर

# जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा ९७ टक्के निकाल

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शालांत परीक्षेचा निकाल ९७ टक्के लागला असून यावर्षीही विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निकालाची यशस्वी परंपरा कायम राखण्यात यश मिळवले आहे. जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या माध्यमिक शालांत परीक्षेच्या निकालात यावर्षी शाळेचा निकाल एकूण ९७% लागला असून या निकालामध्ये २३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह , २१विद्यार्थी प्रथम श्रेणीत, द्वितीय श्रेणीत ८ तर तृतीय श्रेणीत १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संपूर्ण विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान कु नंदिनी योगीराज पांडे हिने ९७ टक्के गुण प्राप्त करून पटकावला आहे . शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या गणित , इंग्रजी , विज्ञान या विषयाच्या जादा तासिका, साप्ताहिक, मासिक व सराव परीक्षांचा परिणाम म्हणून या निकालाचे यश विद्यार्थ्यांना संपादन करता आले असल्याचे मुख्याध्यापक विनायक मुंजे यांनी सांगितले आहे.

गेल्या पंचवीस वर्षापासून जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय आपल्या निकालाची यशस्वी परंपरा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन जोपासत आहे. इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक व्ही .बी.चव्हाण, डॉ. डी एच. थोरात, प्राचार्य बी.आय. खडकभावी तसेच सर्व शाळेचे मुख्याध्यापक विनायक मुंजे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत .

# शब्दवेधच्या प्रा. सुरेश पुरी लोकपत्रकारिता पुरस्कारासाठी अमर हबीब यांची निवड

अंबाजोगाई | प्रतिनिधी

शब्दवेध बुक हाऊस



प्रकाशन संस्थेच्या वतीने जनसंपर्क तज्ज्ञ प्रा. सुरेश पुरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, 'जनसंपर्कतज्ज्ञ प्रा. सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता' पुरस्काराची आज घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे पाहिले मानकरी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब, (अंबाजोगाई) यांची निवड करण्यात आली आहे. शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने या वर्षापासून सदर पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. अकरा हजार रुपये रोख रक्कम, मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.पुरस्कार वितरणा दि.१८ मे रोजी सायंकाळी सहा वा. मौलाना आझाद संशोधन केंद्र,मजनु हिल,संभाजीनगर येथे होणार आहे.अमर हबीब यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# माहेश्वरी समाजाच्या वतीने कॅन्सर लसीकरण

अंबाजोगाई | प्रतिनिधी

श्री बांगड माहेश्वरी मेडिकल वेलफेअर सोसायटीच्या सहकार्याने महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा व बीड जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने अंबाजोगाई तालुका माहेश्वरी सभेकडून ९ ते १४ वयोगटातील बालक व १५ ते २६ वयोगटातील तरुण-तरूणींचे कॅन्सर लसीकरण दि. ११ व १२ मे रोजी येथील भुतडा हॉस्पीटल मध्ये संपन्न झाले.

या लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शुभदा लोहीया (राठी) यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष ॲड. श्रीकृष्ण



तोष्णीवाल, पूनम जाजू, संजय सोनी, डॉ. मनिषा भुतडा, डॉ. अनिल भुतडा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कविता मुंदडा व राजश्री मुंदडा यांच्या महेश वंदनाने झाली. यावेळी बोलताना डॉ. शुभदा लोहीया म्हणाल्या की, भारतात कॅन्सरने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोणत्याही आजारावर उपचाराऐवजी प्रतिबंध हा महत्वाचा असतो. मागील काही वर्षात भारतात कॅन्सरवर लस उपलब्ध झाल्या आहेत. मात्र त्या महाग असल्याने सामान्य माणसाला न परवडणा-या आहेत. बांगड माहेश्वरी मेडिकल वेलफेअर ◀◀ पान ३ वर

# मोदी ज्वेलर्स आयोजित उखाणा स्पर्धेत पल्लवी बोडखे ठरल्या प्रथम विजयाच्या मानकरी

अंबाजोगाई | प्रतिनिधी

पारंपरिक ठसकेबाज शैलीतले पल्लेदार उखाणे , काही मिश्किल , चिमटे काढणारे उखाणे, काही चमकदार नवीन कल्पनांचा आविष्कार तर कधी हास्याचे फवारे आणि उत्स्फूर्त टाळ्यांचा गजर अशा अपूर्व उत्साहात मोदी ज्वेलर्सची उखाणा रंगतदार स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. नथ महोत्सवाच्या निमित्ताने मोदी ज्वेलर्सच्या वतीने उखाणा स्पर्धेचे आयोजन केले होते.या आगळ्यावेगळ्या व अनोख्या स्पर्धेला अंबाजोगाई शहर तथा पंचक्रोशीतील महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. ही स्पर्धा



सुरू असताना अचानकपणे आलेला पाऊस व त्यामुळे सुरू झालेला विजेच्या लपंडाव याचा महिलांच्या उत्साहावर कोणताही परिणाम झाला नाही. आपल्या कुटूंबावर असलेले निरातिशय प्रेम व्यक्त करणाऱ्या उखाण्यांबरोबरच पर्यावरण, आरोग्य, सामाजिक व इतर विषयांवरचे स्वरचित उखाणे हे स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. यातच ऑपरेशन सिंदूर विषयी एका सोज्वळ तथा चाणाक्ष गृहिणीच्या आपल्या उखाण्याद्वारे तितक्याच कणखर भावना अत्यंत समर्पक शब्दांत सादर केलेल्या पल्लवी राहुल बोडखे यांनी निर्विवाद प्रथम क्रमांक (रु.५०००/-रोख ,प्रशस्तीपत्र) पटकावला. इतर विजेत्या स्पर्धकांमध्ये अस्मिता थोरात द्वितीय क्रमांक(रु.३,०००/-रोख व प्रशस्तीपत्र), शीतल चाटे ,अयोध्या घोडके (तृतीय क्रमांक विभागून प्रत्येकी (रु.१,०००/-रोख व प्रशस्तीपत्र) यांच्यासह विविध उत्तेजनार्थ स्पर्धकांच्या बक्षिसात (प्रत्येकी रु.५०० /- रोख व प्रशस्तीपत्र ) ज्यामध्ये कांता सोमाणी , सुमेधा चाटे, अर्चना स्वामी , वैशाली केंद्रे,अंजली यादव , जयनंदा इंगळे,उज्वला होटट्टे , लक्ष्मी नागरगोजे, ◀◀ पान ३ वर

# कोट्यवधींच्या पाणी योजना गिळंकृत; आता जलजीवनचे पाणी तरी मिळणार का?

### आष्टी तालुक्यातील कामे अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करा–दरेकर

आष्टी | प्रतिनिधी

आष्टी मतदार संघात यापूर्वी राबविण्यात आलेल्या भारत निर्माण, स्वजलधारा, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल, मुख्यमंत्री पेयजल, प्रधानमंत्री पेयजल या सारख्या विविध योजना राबविण्यात आल्या. यासाठी प्राप्त झालेला शेकडो कोटींचा निधी अधिकारी व कंत्राटदारांनी संगनमताने निकृष्ट कामे करून गिळंकृत केल्याने वर्षानुवर्षे महिलांच्या डोक्यावरील असलेला हंडा उतरण्यास तयार नाही. त्यात आता जलजीवन योजनेची भर पडते की काय? अशी भीती आष्टी मतदारसंघातील ग्रामस्थांना भेडसावत असून मुदती संपूनदेखील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील जलजीवनची कामे अर्धवट

भारत निर्माण, स्वजलधारासारख्या योजना ठरल्या चराईचे कुरण

आष्टी मतदारसंघात भारत निर्माण योजना, स्वजलधारा योजना, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल योजना, मुख्यमंत्री पेयजल, योजना, प्रधानमंत्री पेयजल योजना यासारख्या विविध योजनांवर शेकडो कोटींचा निधी खर्च होऊनही अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने निकृष्ट कामांमुळे वर्षानुवर्षे डोक्यावर असलेला हंडा उतरला नाही. त्यात आता जलजीवन योजनेची भर पडतेय की काय अशी भीती मतदार संघातील जनतेला आहे.

अवस्थेतच आहेत. कामे मुदतीत पूर्ण न केल्यामुळे नियमाप्रमाणे कंत्राट दारांवर १० टक्के दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे.याबाबत जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्य कार्यकारी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार, दि.१४ मे २०२५ । पान ७

# पुण्यात पॅलेस्टिनी पोस्टरवरुन गदारोळ, पॅलेस्टाईनचा प्रचार करणाऱ्यांना मारहाण

पुणे : पुण्यात पॅलेस्टिनी पोस्टरवरुन गदारोळ माजला आणि त्यानंतर मारहाणीची घटना घडली. इऊ्ठ या पॅलेस्टिनी समर्थक संघटनेच्या सदस्यांनी पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आंदोलन केलं. त्याचवेळी त्यांनी ज्यू धर्मियांच्या विरोधात प्रचार सुरू केला. नंतर या ठिकाणी आलेल्या हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी त्यांना मारहाण केल्यानंतर हा वाद पेटला. पोलिसांनी या प्रकरणी दोन्ही बाजूंवर गुन्हा दाखल केला आहे.

पुण्यात बीडीएस चळवळीच्या कार्यकर्त्यांनी पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ ८ मे रोजी पत्रक वाटप केली होती. त्यामुळे त्यांना पुण्यातील कर्वेनगर परिसरात मारहाण झाली होती. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. बीडीएस (बॉयकॉट, डिवेस्टमेंट, सँक्शन्स) संघटनेचे कार्यकर्ते पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आंदोलन करत असताना त्यांनी काही पाश्चिमात्य खाद्य पदार्थांच्या दुकानाबाहेर सुद्धा ठिय्या मांडला होता. तसेच पॅलेस्टाईन समर्थनार्थ त्यांनी काही पत्रक सुद्धा वाटली.

हे आंदोलन सुरू असल्याची माहिती काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी त्याठिकाणी धाव




घेतली. यावेळी दोन्ही बाजूने बाचाबाची झाली आणि यात आंदोलनाचा विरोध करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आंदोलकांना मारहाण केली. आता याप्रकरणी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्यू धर्मियांविरोधात प्रचार

पॅलेस्टाईन समर्थकांनी बेकायदेशीररित्या जमाव जमवून सध्या भारत व पाकिस्तान या दोन देशामध्ये युद्धसदृष्य परिस्थिती सुरू असताना हे आंदोलन केलं. रस्त्याने, फुटपाथवरुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडवून त्यांना आकर्षित करून 'ज्यू लोक निच आहेत. त्यांनी पॅलेस्टाईनमधील लोकांच्या कत्तली केलेल्या आहेत. ज्यू लोकांना सर्वांनी वाळीत टाकायला पाहीजे. त्यांचा निषेध केला पाहीजे' असं आवाहन केलं.

हमास दहशतवादी संघटनेचे समर्थन केले

या आंदोलकांनी 'ज्यू' धर्मातील लोकांच्या भावना दुखावतील असे प्रक्षोभकपणे बोलून, ज्यू आणि इतर धर्मीयामध्ये शत्रुत्व निर्माण होईल अशी व्यक्तव्य केली. हमास सारख्या संघटनेच्या विचार, आचारांना खतपाणी घालून, त्यांचे समर्थन करणारे पोस्टर्स जनतेत वाटून त्यांच्या विचारांचा प्रचार करून, धार्मिक तेढ निर्माण करून जातीय सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सस्मित राव, कमल शाह, स्वप्नजा लिमकर, ललिता तंगिराला आणि इतर कार्यकर्त्यांवर वारजे पोलिस ठाण्यात कलम भारतीय न्याय संहिता कलम १९६, २९९, ३०२, १८९(२), १९०, १२६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही बाजूंवर गुन्हा दाखल

पॅलेस्टाईन समर्थकांनी मारहाण केल्यामुळे स्वप्नजा लिमकर यांनी वारजे पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. फिर्यादी या बी डी एस चळवळीच्या कार्यकर्त्या असून त्यांनी कर्वेनगर परिसरात असणाऱ्या डॉमिनोस पिझ्झा बाहेर पॅलेस्टाईन समर्थनार्थ आंदोलन करत असताना काही जणांनी जमाव करून फिर्यादी यांना शिवीगाळ करत त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मारहाण केली. ज्या कार्यकर्त्यांनी पॅलेस्टाईन समर्थकांना मारहाण केली त्यांच्यावर आता गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी वारजे पोलिस ठाण्यात महेश पावळे, सागर धामे, अमित जाधव व इतर यांच्यावर कलम ७१, १८९(२), १९०, १९१(२), ११५(२), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दौंड तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपले; अनेक गावांमध्ये विजेचा कडकडाट

पाटस । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील अनेक गावांमध्ये विजेच्या कडकटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. तालुक्यातील केडगाव, पाटस, वरवंड, कुरकुंभ यासह काही भागात मुसळधार पावसाच्या सरी कोसळल्या. परिणामी, काढण्यात आलेला कांदा, गहू व इतर शेत पिकांचे नुकसान झाले आहे. या पावसाचा वीटभट्टी व्यावसायिकांनाही मोठा फटका बसला आहे.



मागील तीन महिन्यांपासून उष्णतेच्या तीव्रतेने आणि उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना अवकाळी पावसामुळे थोडाफार दिलासा मिळाला आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तीव्र उन्हात दुपारनंतर अचानक आकाशात काळे ढग आल्याने ढगाळ वातावरण निर्माण झाले. विजेच्या कडकटासह अवकाळी पावसाने सुरुवात केली. तालुक्यातील पाटस, केडगाव, वरवंड, कुरकुंभ, दौंड यासह अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाला.

दरम्यान, पाटसमध्ये सोमवारी सायंकाळी सहाच्या पुढे अचानक मुसळधार पावसाला सुरुवात झाली. परिणामी, पाटसच्या आठवडे बाजारात आलेल्या नागरिकांची धांदल उडाली. तर, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतात काढणीस आलेला कांदा, गहू आणि इतर शेत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच चौफुला, केडगाव, पाटस या भागातील वीटभट्टी व्यावसायिकांचे या पावसाने मोठे नुकसान केले आहे.

विदर्भ, मराठवाड्यासह राज्यात सर्वत्र अवकाळी पावसाचे थैमान

विदर्भ, मराठवाड्यासह राज्यात सर्वत्र अवकाळी पावसाने थैमान घातले असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. एकीकडे शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना, अवकाळीमुळे बळी गेल्याचीही घटना सोमवारी घडली. सोमवारी लातूर आणि बुलढाणा जिल्ह्यात वीज कोसळण्याच्या घटना घडली. या दोन्ही घटनांमध्ये नऊ जण जखमी झाले आहेत, तर एकाचा मृत्यू झाला आहे.

# राज्यात वाढतीये बिबट्याची दहशत; मानवी वस्त्यांमध्ये शिरुन रात्रीच्या अंधारात जेष्ठ नागरिकावर घातली झडप

दौंड : राज्यामध्ये बिबट्याची दहशत वाढत आहे. अनेक ठिकाणी मानवी वस्त्यांमध्ये बिबट्या शिरत असून यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. त्याचबरोबर सर्वसामान्य लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी जुन्नर भागामध्ये बिबट्यांचे अस्तित्व जास्त आढळून येत होते. आता मात्र पश्चिम महाराष्ट्रातील गावागावांमध्ये बिबट्या आढळत आहेत. शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई आणि दौंड तालुक्यातील खामगाव परिसरात बिबट्या आढळून आला आहे.

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई येथील मुंजाळवाडीत शुक्रवारी (दि.०९) रात्रीच्या सुमारास बिबट्या मानवी वस्तीमध्ये शिरल्याची घटना घडली. शत्रुघ्न साहेबराव देवकर यांच्या गोठ्यातील शेळीवर बिबट्याने हल्ला करत तिला ठार केले. त्यामुळे कवठे येमाई परिसरात बिबट्यांची दहशत कायम असल्याचे दिसून येत आहे. शेतकरी शत्रुघ्न देवकर यांनी आपल्या घरासमोर पशुधनासाठी दहा फुट उंचीचे तारेचे कंपाऊंड केले आहे. या दहा फुट कंपाऊंडच्या तारेवरुन बिबट्याने आत उडी मारत प्रवेश करुन आतमध्ये बांधलेल्या तीन वर्ष्यांच्या गाभण शेळीवर हल्ला करून ठार केले.या घटनेने शेतकरी देवकर यांचे सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले. या भागात वारंवार अशा घटना घडत असल्याने पाळीव पशुधनाचे संरक्षण कशा प्रकारे करावे ? हा प्रश्न पशुपालक शेतकऱ्यांच्या समोर उभा ठाकला आहे.


अशा वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे पशुपालन करणारे शेतकरी ट्रस्ट झाले असून पाळीव प्राण्यांचे नाहक बळी जात आहेत. बिबट्याच्या वाढत्या दहशतीने स्थानिक शेतकऱ्यांनी बिबट्यांना पिंजऱ्यात पकडण्यासाठी शिरूर वन विभागाने योग्य त्या उपाययोजना तात्काळ करण्याची मागणी केली आहे.या घटनेचा शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल गणेश पवार, वनरक्षक नारायण राठोड, वनमजूर हनुमंत कारकुड यांनी पंचनामा केला आहे.

# दोघांमधील संबंध अन् आर्थिक व्यवहारातून वाद, पिंपरीतील १८ वर्षीय तरुणीचा शेजाऱ्यानेच काटा काढला, परराज्यातील मामा-भाच्याला अटक

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड येथे रविवारी ११ मे रोजी एका १८ वर्षीय तरुणीचा धारधार शस्त्राने वार करून खून केल्याची घटना समोर आली होती. या घटनेची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दोघांमध्ये असलेल्या संबंध आणि आर्थिक व्यवहारातून ही हत्या शेजाऱ्याने केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी मामा भाच्याला दोघांना ताब्यात घेतलं आहे. कोमल भरत जाधव (१८ वर्ष) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. उदयभान यादव (वय ४५) आणि त्याचा सख्खा भाचा यांना पोलिसांनी अटक केली आहे. उदयभान यादव हा मूळचा उत्तर प्रदेशचा आहे.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, खून झालेली तरुणी कोमल जाधव ही पिंपरी चिंचवड परिसरातील वाल्हेकरवाडी परिसरात आपल्या कुटुंबासोबत राहत होती. रविवारी कोमल जाधव घरामध्ये होती. यादव हा





तिच्याच शेजारी वास्तव्यास होता. त्या दोघांमध्ये आर्थिक व्यवहारातून वाद झाले होते. त्यामुळे उदयाभान याने कोमल हिला संपवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्याने आपल्या भाच्याच्या मदतीने रविवारी रात्री दुचाकीवरून डोक्यात हेल्मेट घालून कोमलला घराच्या बाहेर बोलावून घेतलं. कोमल घराच्या खाली आली, त्यानंतर तिच्यावर शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात कोमलचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मयत कोमल जाधव आणि आरोपी हे शेजारी राहत होते. त्या दोघांमध्ये संबंध होते. त्यांच्यामध्ये आर्थिक व्यवहारही झाले होते. त्यातूनच दोघांमध्ये वाद झाले होते. त्यानंतर आरोपीने भाच्याच्या मदतीने हत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर वाल्हेकरवाडी परिसरात भीतीचं वातावरण पसरले. अधिक तपास पोलिसांकडून सुरु आहे.

वादामुळे आरोपींनी कट रचून हत्या केल्याची शक्यता

पोलिसांनी आरोपींकडे केलेल्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे, पिंपरी चिंचवड शहरातील वाल्हेकरवाडी परिसरात काल रात्री कोमल भरत जाधव या तरुणीवर धारदार शस्त्राने वार करून भर रस्त्यावर तिचा निर्घृण खून केला होता, या प्रकरणी उत्तर प्रदेशाचा रहिवाशी असलेल्या ४५ वर्षीय मुख्य आरोपी उदयभान यादव आणि त्याच्या सख्या भाच्याला पोलिसांनी अटक केली, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत तरुणी आणि आरोपी हे शेजारी राहत होते, दोघांमध्ये संबंध आणि आर्थिक व्यवहार देखील असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याच संबंधातून निर्माण झालेल्या वादामुळे आरोपींनी कट रचून कोमलची हत्या केल्या गेल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय दर्जा वाढला; मात्र कारभार जुन्याच नावावर

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक कार्यालयाचा कारभार वर्षभरापूर्वी प्रादेशिक नावाने सुरु झाला. त्यानुसार कार्यालयाच्या प्रवेशद्वारापासून ते अधिकार्यांच्या नावाची पाटी देखील बदलण्यात आली; मात्र अद्यापही नागरिकरांना डीडी भरताना, रकमेचा भरणा करताना उपप्रादेशिक परिवहन नावाने व्यवहार करावा लागत आहे; तसेच तक्रार करण्यासाठी जुन्याच ई- मेल आयडीचा वापर केला जात आहे. राज्य सरकारची परवानगी व इतर तांत्रिक अडचणींमुळे उपप्रादेशिक नावानेच कारभार सुरु असल्याचे सांगितले जात आहे.

शासनाच्या जुलै २०२३ निर्णयानुसार कार्यालयाचा दर्जा वाढवून तो पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन करण्यात आले; मात्र प्रत्यक्ष कारभार सुरु होण्यास वेळ लागला. दुसरीकडे, कार्यालयाचा दर्जा वाढवूनही अनेक मंजुर पदांपैकी काही पदे रिक्त आहेत. परिणामी, ताण वाढून इतर अधिकार्यांवर कार्यभार सोपविण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत जुन्नर, आंबेगाव, पिंपरी, चिंचवड, मावळ, खेड याचा समावेश होतो. दर्जा वाढल्याने अधिकार्यांची संख्या वाढेल, अशी अपेक्षा होती. परंतु, परिवहन अधिकारी व्यतिरिक्त अन्य अधिकारीवर्ग संख्येत वाढ




झाली नाही; मात्र या कार्यालयातील सहायक परिवहन अधिकारी यांना बढती मिळाली आहे. त्यांची जागा गेल्या अनेक महिन्यापासून रिक्त आहेत.

दरम्यान, पिंपरी- चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच प्रत्यक्षात कारभार हा जुन्या नावाने म्हणजेच उप प्रादेशिक परिवाहन डीआरटीओ १४ या नावानेच चालतो. त्यामुळे चलन भरणे, डीडीचा भरणा करणे या गोष्टी त्या नावानचे केल्या जात आहेत; तसेच विशेष म्हणजे नागरिकांच्या तक्रारी व त्यावर उत्तर देखील याच मेल आयडीच्या माध्यमातून पाठवली जातात. त्यामुळे कार्यालयाचे नाव बदलले मात्र, कारभार जुन्याच नावाने सुरू आहे.

नवीन ट्रॅक, तपासणी केंद्र वाढविणे गरजेचे

परिवहन कार्यालयाचा दर्जा वाढल्यानंतर नव्याने काही यंत्रणा होणे गरजेचे आहे. ऑनलाईन प्रणाली सुरु झाली आहे; मात्र प्रत्यक्षात आणखी बदल होणे गरजेचे आहे. त्यामध्ये नवीन ट्रॅक, अद्ययावत तपासणी केंद्र, अधिकारी यांना बसण्यासाठी कक्ष, पार्किंग व्यवस्था, सारथी सिस्टीम यात नव्याने काही बदल करावे लागणार आहेत; तसेच प्रलंबित वाहन परवाने आणि फिटनेस संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

चार अधिकारी पदे रिक्त

नव्याने पद निर्माण झाल्याने ४ वरिष्ठ अधिकारी तसेच, २० कर्मचार्यांची येथील कार्यालयास आवश्यकता आहे. त्यात एक उप प्रादेशिक, दोन सहायक परिवहन अधिकारी यांची देखील खुर्ची रिकामी आहे.

# लोकशाहीचा आत्मा हरवला; पृथ्वीराज चव्हाणांनी व्यक्त केली खंत

**पुणे । प्रतिनिधी**

सध्याच्या राजकीय परिस्थितीत लोकशाहीचा केवळ पाया उरला असून, तिचा आत्मा हरवत चालला आहे. कायद्याचा गैरवापर करून लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी तीव्र चिंता माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली. पक्षांतरबंदी कायदा रद्द करण्याची मागणी करतानाच, सिमला करारात तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीला मान्यता देणारा बदल केंद्र सरकारने केला आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

पुणे पत्रकार कट्ट्याच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी रानडे इन्स्टिट्यूट येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.चव्हाण यांनी



लोकशाहीसमोरील आव्हानांवर भाष्य केले. ते म्हणाले, निवडणुका होत आहेत, लोकशाही आहे पण त्यात आत्मा शिल्लक राहिला नाही. राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही संपली आहे. पक्षांतरबंदी कायद्याचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत आहे, त्यामुळे संसदीय लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे. हा कायदा रद्द न झाल्यास संसदीय लोकशाहीची हत्या होईल. असे प्रतिपादन केले. त्यांनी माध्यमांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अनेक वृत्तवाहिन्या खोट्या बातम्या दाखवतात, माध्यमाने आपली भूमिका चोख पार पडायला हवी, असेही त्यांनी नमुद केले.

# पिंपरी चिंचवड शहरात खुनाच्या दोन घटना

पिंपरी । प्रतिनिधी

जुन्या भांडणाच्या वादातून तीन जणांनी मिळून एका अल्पवयीन मुलावर कोयत्याने वार करत खून केला. ही धक्कादायक घटना रविवारी (दि. ११) रात्री साडेदहाच्या सुमारास वडमुखवाडी येथील साई मंदिराजवळ घडली. या प्रकरणात दिघी पोलिसांनी अवघ्या काही तासांत तिघा आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे वडमुखवाडी परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोहम सचिन शिंदे (१७, रा. माऊली नगर कॉलनी क्र. १, दिघी) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी सोहमचे वडील सचिन प्रल्हाद शिंदे (४६) यांनी दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीवरून नामदेव ऊर्फ निलेश शिंदे, शुभम पोखरकर आणि सुमित शिंदे या तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

पोलिस उपआयुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास सोहम शिंदे आपल्या काही मित्रांसोबत वडमुखवाडी येथील साई मंदिराजवळ गप्पा मारत थांबला होता. त्या वेळी आरोपी तेथे आले.

त्यांनी सोहम याच्याशी जुन्या भांडणावरून वाद घातला. त्याला शिवीगाळ करत, तुला जिवंत सोडणार नाही, असे म्हणत अचानक कोयत्याने त्याच्यावर हल्ला चढवला. आरोपींनी सोहमच्या डोक्यावर, छातीवर आणि पाठीवर कोयत्याने सपासप वार केले.

या हल्ल्यात सोहम गंभीर जखमी झाला आणि तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. आजूबाजूच्या नागरिकांनी तत्काळ त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

ही घटना घडल्यानंतर दिघी पोलिस ठाण्याचे कर्मचारी आणि मालमत्ता विरोधी गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत काही तासांतच आरोपी नामदेव ऊर्फ निलेश शिंदे, शुभम पोखरकर आणि सुमित शिंदे यांना ताब्यात घेतले. तपास दिघी पोलिस करत आहेत.

# शिवसनेच्या खासदाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घेतली भेट; केली 'ही' मोठी मागणी

पिंपरी : पुणे-लोणावळा या रेल्वे मार्गाच्या तिसऱ्या व चौथ्या ट्रॅकच्या कामाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. यासाठी राज्य सरकारची ५० टक्के हिश्याची रक्कम तातडीने द्यावी. त्यामुळे काम सुरु करण्याचा मार्ग मोकळा होईल. निधी तत्काळ देण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे. याबाबत खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांना तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकची सविस्तर माहिती



दिली. त्यासाठीचा राज्य सरकारचा हिस्सा तातडीने देण्याची मागणी करण्यात येत आहे.

खासदार बारणे म्हणाले की, गेल्या तीन दशकांपासून पुणे, लोणावळा दरम्यान तिसरा व चौथा ट्रॅक व्हावा यासाठी पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांची मागणी आहे. २०१४ मध्ये मी निवडून आल्यानंतर त्यासाठी पाठपुरावा सुरु केला. केंद्र सरकारने २०१५-१६ मध्ये पुणे-लोणावळा लोह मार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा केली. त्याचा विकास आराखडा (डीपीआर) तयार केला. १५ फेब्रुवारी २०१९ मध्ये रेल्वे बोर्डाने महाराष्ट्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. त्यासाठी २०१७ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद देखील केली. याचा ५० टक्के खर्च केंद्रीय रेल्वे विभाग आणि ५० टक्के राज्य सरकार अशी खर्चाची विभागणी आहे.